मूल्य ₹१५/-

# हसती दुनिया

(मराठी)

अंक ११ • वर्ष १५ वे • पृष्ठे ५२ • नोव्हेंबर - २०१८



# हसती दुनिया (मराठी)

बालकांच्या बौध्दिक आणि आध्यात्मिक विकासाची आगळी वेगळी भेट

अंक ११ • वर्ष १५ वे • पृष्ठे ५२ • नोव्हेंबर २०१८


संपादक
राजेंद्र थोरात
(अवैतनिक)

सहसंपादक
सुरेश तिर्लोटकर

सजावट व चित्रे
उदय सत्यवान पांगे
राजनंदन पिंपळकर

संत निरंकारी मंडळ (चेंबूर) करिता मुद्रक व प्रकाशक श्री. चंद्रकांत अनंत जाधव यांनी ही हसती दुनिया पत्रिका एम.पी.प्रिंटर्स, बी-२२०, फेज-II, नोएडा-२०१३०५, जिल्हा-गौतम बुध्द नगर (उत्तर प्रदेश) येथे छापून संत निरंकारी भवन, ५० मोरबाग रोड, दादर (पूर्व), मुंबई -४०० ०१४. येथे प्रकाशित केली.



कार्यालयाचा पत्ता
५०, मोरबाग रोड, संत निरंकारी सत्संग भवन,
दादर, मुंबई - ४०० ०१४
ई-मेल
marathihastiduniya@gmail.com
Website : www.nirankari.org


लेखकांच्या मताशी सहमत असणे अनिवार्य नाही

| वर्गणी | १ वर्ष | ५ वर्षे |
|---|---|---|
| भारत/ नेपाळ | रु. १५०/- | रु. ७००/- |
| यु.के. | £ 15 | £ 80 |
| युरोप | € 20 | € 100 |
| अमेरिका | $ 25 | $ 120 |
| कनाडा/ ऑस्ट्रेलिया | $ 30 | $ 140 |

मासिक पत्रिकेविषयी चौकशीसाठी हेल्प लाईन : ०२२-२४१० ५७४९




## कथा


- आप्तेष्टांना निरोप ०६
- सेवक ०८
- मोठं व्हायचंय ना? १४
- सनाथ २०
- जशास तसे ४२
- स्वच्छता अभियान ४८








## स्तंभ


- दोन शब्द ०४
- शब्दकोडे १०
- दादाला विचारु या ११
- विचारपुष्प १२
- आरोग्याचा मंत्र २४
- वाढदिवसाच्या शुभेच्छा २६
- वैज्ञानिक प्रश्नोत्तरे २८
- दिव्यवाणी ३१
- हसा मुलांनो हसा ३२
- सामान्य ज्ञान ४६
- चित्र काढा आणि रंग भरा ५०


## विशेष व प्रेरक प्रसंग


- बूट पॉलिश करणारा .... ०५
- दुर्गभ्रमंती २२
- एकता २९
- आपले जिल्हे -बीड ३०
- समर्थ दर्शन -४९ ३४
- ग्रेट पिरॅमिड ३५
- तेजस्विनी -७९ ४०
- सर्वात पहिले ग्रीटींग कार्ड ४४
- पक्षीजगत ४७









## चित्रकथा


- आजोबा १६
- किट्टी ३६


## कविता


- सण दिवाळीचा १५
- बंधू येईल न्हेयाला २१
- आली दिवाळी ४५

# थोरपण

पंडित जवाहरलाल नेहरुंना चाचा नेहरु म्हणून आपण सारे ओळखतो. पंडितजींना लहान मुलं खूप आवडत. मुलं त्यांना प्रेमाने 'चाचा नेहरु' म्हणत. म्हणूनच त्यांचा जन्मदिवस बालदिन म्हणून साजरा केला जातो.

पंडितजींच्या बालपणातील हा प्रसंग आहे. पंडित जवाहरलालजींचे वडील मोतीलाल नेहरु फार मोठे वकील होते. त्यांचा श्रीमंतीचा थाट होता. जवाहरलालजींचं बालपण ऐश्वर्यात व्यतीत होत होतं. एकदा बालक जवाहर आपल्या वडिलांच्या टेबलाजवळ गेला. टेबलावर ठेवलेले पाच-सहा चकचकीत महागडे पेन पाहून त्यातील एक पेन घेण्याचा मोह जवाहरलालला झाला. त्याने विचार केला, की एक पेन घेतलं तर बाबांच्या कुठे लक्षात येणार आहे! पेन खिशात घालून जवाहर चूपचाप निघून गेला. थोड्या वेळाने मोतीलालजी आले. लिहिण्यासाठी त्यांनी हातात पेन घेतलं, त्यावेळी त्यांच्या लक्षात आलं, की एक पेन गायब झालेलं आहे. त्यांनी सर्व नोकरांना विचारलं. सर्वत्र शोधाशोध केली. पण पेन काही सापडलं नाही. मोतीलालजींच्या रागाचा पारा चढला होता. छोट्या जवाहरला मोतीलालजींच्या टेबलाजवळ येताना एका नोकराने पाहिलं होतं. त्याने हिम्मत करत जवाहरलालचे खिसे तपासले. जवाहरच्या खिशात पेन सापडलं. जवाहरने चोरी केली हे पाहून शिस्तप्रिय मोतीलालजींचा संताप अनावर झाला. त्यांनी जवाहरला भरपूर चोप दिला आणि सांगितलं, 'पेन ही शोभेची वस्तू नाही, पेनाला योग्य न्याय देणारा हवा.' बालपणी ऐकलेलं हे वाक्य त्यांना नीटसं समजलं नाही; पण मोठेपणी त्या वाक्याचा अर्थ त्यांना कळला. त्यांनी पेनाला न्याय द्यायचं ठरवलं. त्यातूनच **डिस्कव्हरी ऑफ इंडिया** हा जगप्रसिध्द ग्रंथ त्यांच्या हातून लिहिला गेला.

४ फेब्रुवारी १९३५ रोजी अल्मोडा जेलमध्ये असताना त्यांनी आपल्या आत्मचरित्राचे लेखन कार्य पूर्ण केलं. त्यांच्या आत्मचरित्रात या प्रसंगाचं वर्णन करताना ते म्हणतात, वडिलांनी मला मार दिला ते योग्यच झालं. त्यामुळे चोरी, लबाडी, खोटं बोलणं या गोष्टींपासून मी लांब राहिलो आणि म्हणूनच गांधीजींचा आवडता शिष्य बनलो. सत्यप्रिय सत्याग्रही अनुयायी ठरलो.

म. गांधीजींनी देखील आपल्या **सत्याचे प्रयोग** या आत्मचरित्रात बालपणात घडेल्या प्रसंगाचे वर्णन करताना आपल्या हातून झालेल्या चुका प्रामाणिकपणे कबूल केलेल्या आहेत.

मित्रांनो, जन्मत:च कोणी थोर अथवा महान होत नाही. प्रत्येक थोर पुरुषांच्या जीवनात अनेक चढ-उतार येतात. कठीण प्रसंगातून तावून-सुलाखून निघाल्याशिवाय थोरपण येत नसतं. यासाठी थोर पुरुषांची आत्मचरित्रं वाचली पाहिजेत. तेव्हाच कळून येतं की - टाकीचे घाव सोसल्याशिवाय थोरपण येत नाही.

- राजेंद्र थोरात..





# बूट पॉलिश करणारा मुलगा अमेरिकेचा राष्ट्रपती

सात-आठ वर्षे वय हे साधारणपणे खेळण्या-बागडण्याचे असते. याच वयामध्ये **लिंडन जॉन्सन** हे त्यांच्या जन्मगावी बूट पॉलिश करुन पोटापाण्यासाठी पैसे कमवत असत. त्यांच्या मनात ही गोष्ट खोलवर रुजली होती, की कोणतेही कार्य छोटे नसते. बूट पॉलिश करुन त्यांनी आपले शिक्षण चालू ठेवले आणि वयाच्या १४ व्या वर्षी दहावीची परीक्षा पास झाले. एकीकडे बूट पॉलिशचे काम आणि दुसरीकडे अभ्यास हे दोन्हीही चालू होते.

जॉन्सनच्या जीवनाचे ध्येय खूप उच्च होते. त्या कामामुळे त्यांनी अभ्यास करणे बंद केले नाही. पैशाच्या कमतरतेमुळे त्यांना १४-१५ वर्षांच्या किशोरावस्थेमध्ये एलिवेटर संचालन, कारची स्वच्छता आणि रस्त्याच्या स्वच्छतेची कामे करावी लागली. लहानपणापासूनच ते कोणतेही काम मन लावून करीत असत.

शालेय शिक्षणानंतर पुढच्या शिक्षणासाठी ते सॅन मार्कोस येथे गेले. ते दिवसा अभ्यास करायचे आणि रात्री कॉलेजमध्ये चौकीदारी करायचे. अशाप्रकारे त्यांनी शिक्षण पूर्ण केले आणि त्याच कॉलेजमध्ये २२ व्या वर्षीच प्राध्यापक झाले. पण त्यांना आणखी शिकायचे होते. त्यामुळे शिक्षकी पेशा सोडून ते वॉशिंग्टनला गेले आणि जॉर्ज टाऊन विद्यापीठातून कायद्याचा अभ्यास करायला सुरुवात केली. त्यानंतर त्यांनी मागे वळून पाहिले नाही आणि प्रगती करीत राहिले.

९ नोव्हेंबर १९६० ला ते अमेरिकेचे राष्ट्रपती झाले. त्यांनी त्यांच्या संपूर्ण आयुष्याची कथा 'टेक्सास क्वार्टली' नावाच्या पुस्तकात खूप कमी शब्दांमध्ये लिहिली आहे - 'मी एक स्वतंत्र मनुष्य, एक अमेरिकन नागरिक, एक अमेरिकन सिनेटर आणि एक डेमोक्रेट आहे.' असे त्यात लिहिलं आहे.



पौराणिक कथा

# आप्तेष्टांना निरोप

भाट-चारण-सूत-किन्नरादी गायक पहाटे आळवून श्रीरामांना जागे करीत, "हे कौसल्यानंदन, श्रीरामा, तुम्ही आता उठा. महाराज, तुम्ही झोपून राहिलात तर सारे जगच झोपून राहील. तुम्ही पराक्रमाने विष्णूसारखे, रुपाने अश्विनीकुमारांसारखे, बुध्दीने बृहस्पती व प्रजापालनात प्रजापतीसारखे आहात. तुमची क्षमा पृथ्वीसारखी, तर तेज सूर्यासारखे आहे. तुमचा वेग वायूसारखा, महादेवासारखे युध्दात अविचल, तर चंद्रासारखे सौम्य आहात. धर्म, कीर्ती आणि लक्ष्मी यांनी आपण सदा संपन्न आहात."

श्रीरामांच्या दरबारात वसिष्ठादी महात्मे, मंत्री-पुरोहित, जनपदांचे स्वामी, क्षत्रिय, भरत-लक्ष्मण-शत्रुघ्न हे तीन बंधू, वानरराज सुग्रीवासह त्याचे श्रेष्ठ वीस वानरशिरोमणी, आपल्या चार राक्षस मंत्र्यांसह बिभीषण, श्रीरामांच्या भेटीसाठी आलेले देशोदेशीचे पराक्रमी राजे, वीर, योध्दे यामुळे दरबार अतिशय संपन्न भासत असे.

श्रीरामांच्या राज्याभिषेकासाठी फार मोठा गोतावळा जमा झाला होता. आता सर्वांना जड

अंत:करणाने प्रेमळपणे निरोप देण्याची वेळ आली. आपले सासरे जनकमहाराज यांचा निरोप श्रीरामांनी घेतला. त्यानंतर आपले मामा केकयनरेश युधाजित, श्रीरामांचे परममित्र काशिराज, राज्याभिषेक सोहळ्यासाठी जमलेले तीनशे भूपाल, या सर्वांना मौल्यवान भेटी देऊन श्रीरामांनी त्यांचा निरोप घेतला.

सुग्रीव, अंगद, हनुमान यांचे तर श्रीरामांनी मोठेच कौतुक केले. त्यांचा विशेष आदर-सत्कार केला. मौल्यवान भेटी त्यांना दिल्या. वानरदळाचे यूथपती नील, नल, केसरी, गंधमादन, सुषेण, जांबवान, गवाक्ष, धूम्र यांचा त्यात समावेश होता.

सुग्रीवाला ह्रदयाशी धरुन श्रीराम म्हणाले, “सौम्या, माझ्या मंगलचिंतनासह तू आता किष्किंधापुरीला जा. मंत्र्यांसह त्या निष्कंटक राज्याचं पालन कर. अंगद, हनुमान, नल, सुपर्ण, तार, जांबवान, नील, शतबली, गवाक्ष, केसरी..... आता नावे म्हणून तरी मी कुणाकुणाची घेऊ, या साऱ्यांवर तुझी प्रेमळ दृष्टी असू दे. कारण या महामनस्वी वीरांनी माझ्यासाठी लढताना आपल्या प्राणांची पर्वा केली नाही. त्यांना कधी दूर करु नकोस.”

बिभीषणाला निरोप देताना श्रीराम म्हणाले, “बंधू, धर्मपूर्वक तू लंकेचं राज्य कर. अधर्मात राज्याचा क्षय होतो, हे तुझ्यासारख्या बुध्दिमंतांनी लक्षात ठेवले पाहिजे.” अशाप्रकारे वानर, अस्वल, राक्षस सर्वांची पाठवणी श्रीरामांनी केली.

भक्त हनुमंत श्रीरामांसमीप आला व बोलू लागला, “प्रभू, तुमचा स्नेह व भक्ती मला सतत लाभू दे. श्रीरामकथा हीच मला प्राणभूत होऊ दे.” यावर श्रीराम म्हणाले, “तसेच घडेल. जगात जोपर्यंत माझी कथा अस्तित्वात असेल तोपर्यंत तुझी कीर्ती अमर राहील. हनुमंता, सदैव तुझ्या ऋणात राहणे मला आवडेल.” श्रीरामांनी आपल्या गळ्यातला मोत्यांचा हार काढून तो हनुमंताच्या गळ्यात घातला. सर्वांना निरोप देताना श्रीरामांचे डोळे डबडबून आले.

कुबेराने श्रीरामांच्या सेवेसाठी पुष्पक विमान परत अयोध्येस पाठविले व श्रीरामांनी त्याचा स्वीकार केला. श्रीरामांनी लाह्या, फुले, धूप व चंदन वाहून पुष्पक विमानाचे पूजन केले.

श्रीरामांच्या राज्याभिषेकानंतर घडलेल्या या सर्व घटनांचा भरत साक्षी होता. त्याच्या ह्रदयाला जणू आनंदाचे भरते आले व तो आनंदाने म्हणाला, “आता खऱ्या अर्थाने श्रीरामांच्या रामराज्याला सुरुवात झाली.”

❍ **क्रमशः**

कपाट जर चावीने बंद केलेले असेल तर ते चावीशिवाय उघडले जाऊ शकत नाही. आपण कितीही जोर लावला तर चावीशिवाय ते उघडू शकत नाही. त्याचप्रमाणे आपण ज्ञानाच्या चावीनेच मानवीय संस्कारांचे द्वार उघडू शकतो. ज्ञान प्राप्त करुन त्या ज्ञानाचा उपयोगही करणे गरजेचे आहे. चांगले संस्कारच वास्तविकरुपाने मनुष्याला चांगल्या माणसांच्या श्रेणीत आणून ठेवतात.

- सद्गुरु माता सुदीक्षा सविंदर हरदेवजी महाराज





कथा :

# सेवक

खूप खूप वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. हरिपूर नगरीचा राजा हरिहर अतिशय पराक्रमी होता. आपल्या सामर्थ्याने त्याने आजूबाजूचा सर्व प्रदेश जिंकून घेतला. अनेक राजांना त्याने नमवले. काहींना गुलाम बनवले. राजाला आपल्या पराक्रमाचा, सामर्थ्याचा खूप गर्व होता. प्रजेकडे त्याचे दुर्लक्ष झाले होते. मंत्रिमंडळाचाही प्रजेला उपयोग नव्हता. त्या नगरीत एक वृद्ध सेनापती होता. त्याला प्रजेचे हाल पाहवेनात. पण राजापुढे कोणाचे काही चालत नसे. एके दिवशी तो प्रजेचा मोठा जमाव घेऊन राजाकडे गेला. राजाकडे प्रजेचे गाऱ्हाणे मांडले. प्रजेकडे दुर्लक्ष होऊ नये

म्हणून विनंती केली. परंतु राजा उर्मटपणे म्हणाला, “मी काय करावे, हे तुम्ही सांगू नये. मी विशाल नगरीचा स्वामी आहे. मोठमोठे राजे माझ्यापुढे नतमस्तक होतात. त्यामुळे तुम्ही फक्त नतमस्तक व्हा. तुम्ही सारे माझे सेवक आहात. सेवकाने सेवकासारखे राहा. पुन्हा राजवाड्यात तक्रारी घेऊन येऊ नका.”

वृद्ध तपस्वी म्हणाला, “महाराज क्षमा असावी, पण आपण असे म्हणू नये. कारण इथं प्रत्येकजण एकमेकांचे सेवकच आहेत. कुणीही स्वामी नाही.” राजा म्हणाला, “माझ्या हुकूमाने इथं सर्व कारभार चालतो. दास-दासी, नोकर-चाकर, हे सैन्यदल फक्त माझ्या आदेशाची वाट पाहत असतं आणि तुम्ही म्हणता मी स्वामी नाही ?” सेनापती म्हणाला, “महाराज, ही गोष्ट मी तुम्हाला पुराव्यानिशी सिद्ध करुन दाखवीन.” असे म्हणून वृद्ध राजाकडे काठी टेकत येऊ लागला. चालताना मध्येच अडखळला तेव्हा शेजारी उभ्या असलेल्या मंत्र्याने त्याला आधार दिला. कसाबसा सावरत राजापर्यंत पोचला आणि त्याच्या सिंहासनाजवळ पुन्हा अडखळला. त्याचवेळी राजाने त्याला सावरले आाणि नीट उभे केले. सगळे उत्सुकतेने वृद्ध सेनापतीकडे पाहू लागले. तो म्हणाला, “महाराज, मी इथपर्यंत येताना अडखळलो तेव्हा आपल्या मंत्र्याने मला आधार दिला. इथं पोचल्यावर मी पुन्हा अडखळलो तेव्हा तुम्ही स्वतः मला आधार दिला. मग सांगा, आपण एकमेकांचे सेवकच झालो ना! राजन! पृथ्वी, जल, वायू, अग्नी, आकाश ही पाच तत्त्वे देखील ईश्वराने सर्व जीवांच्या सेवेसाठीच निर्माण केली. आपल्या शरीरात ही पाचही तत्त्वे आहेत म्हणून आपल्या देहाचं अस्तित्व आहे. एवढंच काय विश्वाची निर्मिती करणारा ईश्वरदेखील आपला सेवक बनून राहतो. सर्वांची काळजी वाहतो. आपल्या देहात प्राण बनून राहतो. आपल्या सर्व क्रिया करतो. मग सांगा पाहू! आपण एकमेकांचे सेवक झालो ना! “महाराज, आपण शत्रूपासून प्रजेचं रक्षण करता ही देखील सेवा आहे आणि शेतकरी शेतात धान्य पिकवतो म्हणून आपण खातो. विविध व्यवसाय करणारे लोकदेखील एकमेकांच्या गरजा भागवून सेवक असल्याचे सिद्ध करतात.”

राजाला वृद्ध सेनापतीचे बोलणे पटले. त्याने त्याचा सत्कार करुन आपल्या पदरी सल्लागार म्हणून नेमले आणि स्वतःला ‘सेवक’ म्हणून घोषित केले.

❑❑❑

जीवनाची सुंदरता देखील मनाच्या सुंदरतेवर अवलंबून असते. मन सुंदर असेल तर जीवनही सुंदर होते. मनात ज्ञानाची ज्योत प्रकाशित झाली, की मन प्रकाशित होते. अंधकारातून प्रकाशात येण्याने मनात सुंदरता येते. सुंदरतेनेच इहलोक आणि परलोक सुंदर होतो. ज्ञानज्योत (मनात) प्रज्ज्वलीत झाल्याने प्रेम, दया, करुणेचा भाव निर्माण होतो.

*– युगदृष्टा बाबा हरदेवसिंहजी महाराज*



# शब्दकोडे

# १७२

○ पूजा अरोडा ( रेवाडी-हरियाणा )

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ■ | ■ | १ | | २ | ■ | ३ |
| ४ | | | ■ | ५ | | |
| | ■ | ६ | | | ■ | |
| ७ | ८ | | ■ | | ■ | |
| ■ | | ■ | ९ | ■ | १० | |
| ■ | ११ | | | | | ■ |
| १२ | | ■ | | ■ | १३ | १४ |
| ■ | १५ | | | ■ | १६ | |


## आडवे शब्द

१. शरीराचा तोल सांभाळण्याचं काम ........ मेंदूकडून होते.
४. द्युतक्रीडेत हरल्यामुळे बारा वर्षे वनवास भोगणारे
५. मास्टर दीनानाथ मंगेशकर हे लता मंगेशकर यांचे नात्याने ........ होते.
६. रामायणातील पुष्पक विमान हे.... याचे होते
७. राज + ईश = ..............
१०. २४ ताशी घड्याळाप्रमाणे दुपारचा एक म्हणजे .......... वाजले
११. संत निरंकारी मिशनच्या मासिक पत्रिकेची सुरुवात बाबा ............ जी यांनी केली.
१२. 'शेतकऱ्यांचा आसूड' हे पुस्तक महात्मा ..... यांनी लिहिलं
१३. पहिला मराठी बोलपट : अयोध्येचा ........
१५. मुसलमान बांधवांचे प्रार्थना स्थळ
१६. ........ नोव्हेंबर, १९६२ रोजी थोर समाजसेवक धोंडो केशव कर्वे यांचे देहावसन झाले.

## उभे शब्द

१. प्रभू श्रीरामांचा अश्वमेध यज्ञाचा घोडा अडवून त्यांच्याशी युध्द करणारी दोन बालकं
२. अकबर बादशहाच्या दरबारातील मान्यवर
३. हिन्दीमधील पहिला भारतीय बोलपट (हरिश्चंद्र/आलमआरा)
४. तिरंगी ध्वजातील शांतीचे प्रतीक असणारा रंग
८. इस्त्राईल देशाची राजधानी
९. भारतात राष्ट्रीय क्रिडा दिन या महान हॉकी खेळाडूच्या जन्मदिवशी साजरा केला जातो.
१०. इराण देशाची राजधानी
१४. पतीच्या भावाची पत्नी

उत्तरे इतरत्र



# दादाला विचारू या

**प्रश्न : अध्यात्मात सद्‌गुरुला महत्त्वाचं स्थान का दिले आहे ?**

उत्तर : जी गोष्ट सद्‌गुरु करु शकतो, ती परमात्मा करु शकत नाही. परमात्मा फक्त न्याय देतो किंवा कर्मानुसार फळ देतो. परंतु मानव शरीरात अवतरीत सद्‌गुरुमध्ये एवढी शक्ती आहे, की तो प्रत्येक व्यक्तीला क्षमा करु शकतो. ज्याला सद्‌गुरु क्षमा करतो, त्याला ईश्वरसुध्दा शिक्षा करु शकत नाही. सद्‌गुरु सर्वांचं दु:ख दूर करण्यासाठी प्रत्यक्षात निराकाराचे साकार रुप घेऊन आलेला असतो. कितीही कठीण परिस्थिती आली तरी सद्‌गुरुकडे केलेली प्रार्थना त्या संकटाचं निवारण करु शकते. सद्‌गुरु ज्याच्यावर कृपादृष्टी टाकतो त्याच्याकडून अलौकिक कार्य घडू लागतं. म्हणून अध्यात्मात सद्‌गुरुला महत्त्वाचं स्थान दिलं आहे.

**प्रश्न : गुरु हा ब्रह्मा-विष्णु-महेश आहे असं का म्हटलं आहे ?**


उत्तर : सृष्टीचा कार्यभार परमात्म्याने या तीन शक्तींकडे सोपवलेला आहे असा शास्त्र पुराणात उल्लेख आहे. जसे, ब्रह्माकडे जीवसृष्टीला जन्माला घालणे, विष्णुदेवाकडे पालन पोषणाचे कार्य तर महेशाकडे सृष्टीचा प्रलय करणे. या तिन्ही शक्तीप्रमाणे गुरुदेखील कार्य करतो. सद्‌गुरुचरणी आलेल्या अज्ञानी जीवाला गुरुज्ञान देऊन पुनर्जन्म देतो. विष्णुदेवाप्रमाणे भक्तांचे सदैव रक्षण करतो; त्याचा पाठीराखा बनतो. तसेच महेश (श्री शंकर) भक्ताच्या जीवनातील त्रिविध ताप, अज्ञान यांचा नाश करतो.

**प्रश्न : भक्ताने ईश्वराकडे कोणती मागणी करावी ?**

उत्तर : माझ्यासाठी सुखदायी ठरेल आणि तुझ्या भक्तीत अखंड राहण्यासाठी जे सहाय्यक ठरेल ते तू मला दे. ज्या गोष्टींमुळे तुझ्या चरणांचा वियोग होईल अशी कोणतीही गोष्ट मी मागितली तरी तू ती देऊ नकोस. खरं तर भक्ताला परमात्म्याकडे काहीही मागण्याची गरजच उरत नाही. माता ज्याप्रमाणे आपल्या बाळाची काळजी घेते, त्याला केव्हा, काय द्यायचे हे तिला माहीत असते; त्याप्रमाणे परमात्मा आपल्या भक्ताची काळजी घेत असतो. त्याच्यासाठी मागणं शिल्लकच राहत नाही.

**प्रश्न : आत्मा म्हणजे काय ?**

उत्तर : आत्मा हा परमात्म्याचा अंश आहे असे आपण नेहमी ऐकतो. याचा अर्थ आत्मा हा परमात्म्यापासून वेगळा काढलेला तुकडा आहे असे नाही. मुळात आत्मा आणि परमात्मा हे वेगळे नसून एकच आणि अखंड आहेत. जसे, सूर्य आणि किरणे हे शब्द जरी वेगळे असले तरी किरण हे सूर्यापासून वेगळे नाही. सूर्य हा किरणांसह एकच आहे. तसा परमात्मा प्रत्येक प्राणीमात्रात सामावलेला आहे. तो ज्या सजीवात कार्यरत आहे त्या शरीरातील ते चैतन्य म्हणजे आत्मा. आत्म्याची शक्ती तिथे ती प्रगट आहे. तो येत जात नाही.





# जे सत्संगापासून दूर आहेत त्यांना जोडण्याचा प्रयत्न करूया

आज रोहतक येथे येऊन आपल्या सर्वांच्या दर्शनाने आनंद होत आहे. तुमचे जे दर्शन होत आहे त्यात असेही काही सज्जन आले आहेत की, जे अजून मिशनशी जोडलेले नाहीत. त्यांनाही प्रथमच भेटून आनंद झाला.

थोडीशी सूचना मिळाल्यानंतर अल्पावधीतच इतक्या प्रचंड मोठ्या संख्येने सत्संग उपस्थित झाली, हे प्रशंसनीय आहे. आपणा सर्वांना धैर्यपूर्वक आणि मर्यादापूर्वक बसलेले पाहून आनंद होत आहे. आपण सर्वजण जसे बराचवेळ ऐकतही होतात की, 'रोहतक' अर्थात 'रुह तक'. आपल्या

सर्वांच्यामध्ये एक आत्मा आहे. त्याचं आपलं नीजघर हा निराकार आहे.

ज्या जीवनामध्ये निराकार परमात्मा येतो तेच जीवन सार्थक म्हटले जाते. वास्तविक त्याच जीवनाला सार्थकता प्राप्त होते, जे जीवन या कणकणवासी रामाला जाणते, घटाघटामध्ये विराजमान असणाऱ्या या एकाच अल्लाहला जाणते. निराकाराचे आमच्या मनामध्ये वास्तव्य झाले तरच आपण त्याशी जोडू शकतो. निराकार प्रत्येक क्षणी आपल्याकडे पहात आहे, जेव्हा आपल्याला ही जाणीव होईल तेव्हा आपल्याकडून कमीतकमी चुका होतील. खासकरुन जेव्हा आपल्याला माहिती आहे की, निराकार पहात आहे तरी सुध्दा जाणूनबुजून जर आपण चुका करत असू तर मग तेव्हा आपली नीतिमत्ता ठीक नाही असं म्हणाव लागेल. आपण जर प्रत्येक क्षणी स्मरण केले, या निरंकारांची जाणीव ठेवली तर आपला अशा चुकांपासून बचाव होऊ शकतो.

निराकाराच्या जाणकारीपासून जे अनभिज्ञ आहेत त्यांना केवळ एकच विनंती आहे की, पौर्णिमेची रात्र आहे, ढगही नाहीत आणि अशावेळी कोणाला विचारले की, तुम्हाला चंद्र दिसतो आहे का ? तो जर वर बघत असेल, पण त्याचे डोळे जर बंद असतील तर तो म्हणेल की, नाही, मला काहीच दिसत नाही. डोळे उघडायला तर एका क्षणाचा अवकाश लागतो आणि आपल्याला तो पूर्ण चंद्र दिसतो. जर आपण आयुष्यभर डोळे बंदच ठेवले तर काहीच लाभ होणार नाही, ती आपलीच कमतरता असेल, कारण निराकार तर कायमदायम अंगसंग, पानोपानी समावला आहे, पण दृष्टीला दिसत नाही. ज्ञानदृष्टीने तो दिसू लागतो.

निरंकार कृपा करो की, ज्याप्रमाणे हा पंडाल भरलेला दिसत आहे त्याचप्रमाणे सत्संग वाढत राहो. आपण सर्वांनी प्रयत्न करावेत की, जे सत्संगापासून दूर झाले आहेत त्यांना पुन्हा सत्संगाशी जोडण्याचा प्रयत्न करावा.

❑❑❑

## सेवा निष्काम भावनेने करावी.

केवळ बोलण्याने आकाश खाली पाडू शकत नाही. कर्म करणाऱ्याचेच नाव उच्च होते. साधसंगतची सेवा सर्वोत्तम कर्म आहे आणि निराकाराचे स्मरण (जाणीव) हाच सर्वश्रेष्ठ धर्म आहे. गुरसिखाचे काम सेवा करणे आहे. सेवा करताना लक्षात ठेवावे, की तीच सेवा फलदायी होते जी निष्काम भावनेने केली जाते.

सेवा तीन प्रकारची असते. तनाची सेवा शारीरिक श्रम आहे, मनाची सेवा सर्वांचा चांगला विचार करणे (भलं करणे) आणि धनाची सेवा याचा अर्थ अहंकाररहित दान आहे. यामध्ये कोणतीही आकांक्षा नसावी. जो सद्‌गुरु वचन मानून सेवा करतो त्याला सर्व सुखे मिळतात.

*- ममतामयी निरंकारी राजमाताजी*





कथा

# मोठं व्हायचंय ना ?

राजूचा दादा राजूला अंक लिहायला शिकवत होता. शिकवता-शिकवता त्याने राजूला एक धपाटा मारला. राजू म्हणाला, " दादा, तू मला का मारलंस ?" दादा म्हणाला, "कारण मी तुझ्यापेक्षा मोठा आहे." राजू मोठ्याने भोकाड पसरत बाबांकडे गेला. आता आपण कोणाला धपाटा मारायचा ? आपण तर सर्वात लहान आहोत. राजूला आणखीनच रडू येऊ लागले. तो म्हणाला, "बाबा मी मोठा कधी होणार ?" बाबांनी त्याला जवळ घेत प्रेमाने समजावले. तो शांत झाल्यावर बाबा म्हणाले, "बाळ, आपल्यापेक्षा लहान आणि कमजोर असणाऱ्यांना मारणे किंवा

त्यांना कमी लेखणे यात मोठेपणा नसतो, तर लहानांना जो सोबत घेऊन पुढे जातो, तोच मोठा असतो. ऐक तुला एक गोष्ट सांगतो." -

एकदा काय झालं, शून्य ते नऊ अंक एका रांगेत उभे होते. ते उभे असताना आठाचा हलकासा धक्का नवाला लागला. नऊ रागावला. त्याने एक धपाटा आठाच्या पाठीत घातला. आठ म्हणाला, "नऊ दादा, तू मला धपाटा का मारलास?" नऊ म्हणाला, "मी तुझ्यापेक्षा मोठा आहे, कळलं का?" आठाला खूपच राग आला. त्याने आपला राग सातावर काढला. त्याने सातच्या पाठीत धपाटा घातला. सातने विचारले, "मला का मारलंस?" आठ म्हणाला, "मी तुझ्यापेक्षा मोठा आहे ना, म्हणून!" साताने सहाच्या पाठीवर धपाटा मारला. त्यानेही आठप्रमाणेच उत्तर दिले. असे होता होता दोनानेही एकाच्या पाठीत धपाटा घातला. एकाच्या पुढे शून्य उभा होता. तो शून्याच्या पाठीत धपाटा घालू शकत होता; पण त्याने तसं केलं नाही. स्वत:कडे कमीपणा घेत तो शून्याच्या मागे उभा राहिला. त्याने शून्याला आपल्यासोबत घेतले. आता त्याची किंमत आपोआपच वाढली. कारण तो आता एक न राहता १० बनला होता. नवापेक्षा मोठा. राजू आनंदाने टाळ्या वाजवू लागला.

बाबा म्हणाले, "आता कळलं ना बेटा, मोठं व्हायचं असेल तर काय केलं पाहिजे?"

"होय बाबा, दुसऱ्याला कमी न समजता स्वत:कडे लहानपणा घ्यायचा. सर्वांना सोबत घेऊन जायचं, होय ना?"

अगदी बरोबर बोललास!

काय मित्रांनो, तुम्हालाही मोठं व्हायचंय ना?

❒❒❒

# सण दिवाळीचा

आला सण दिवाळीचा
प्रकाशमय जीवन करण्याचा

नरक चतुर्दशी दिवस पहिला
नरकासुराचा वध केला

दिवस दुसरा लक्ष्मीपूजन
लक्ष्मीचा करण्या सन्मान

बलिप्रतिपदा दिवस तिसरा
करण्यासी आनंद साजरा


दिवस चौथा भाऊबिजेचा
बहीण भाऊ अतूट नात्याचा

दिवाळीचे हे दिवस चार
आनंद देऊन जाती अपार

सदा असे आनंदी राहू या
जीवन ज्ञानप्रकाशाने सजवूया




कविता : भरत मारुती चौगले
(कोल्हापूर)




# आजोबा


चित्रांकन : दीपक मेहरा (दिल्ली)

चित्रांकन -रंग : अजय कालडा







एके दिवशी मांजरीवर एका कोल्ह्याची नजर पडली. कोल्हा आश्रमाच्या मागील मांजरीला मारायला पोहचला. त्याला बघताच मांजर फार घाबरली कारण आधीदेखील कोल्ह्याने तिला जखमी केले होते.
ह्यावेळी कोल्ह्याला दुसऱ्यांदा बघून मांजरीने विचार केला, की आज आपला शेवटचा दिवस आहे. परंतु मांजर कशीबशी ऋषीकडे गेली. मांजरीला घाबरलेले पाहून तिला वाचवण्यासाठी ऋषीने तिला उंदीर बनवले.
मांजर आता उंदीर झाल्यानंतर ती कोणत्या ना कोणत्या तरी बिळात राहून आपलं जीवन जगू लागली.


तिला उंदीर बनून राहण्यात चैन पडत नव्हती. आता तिला मांजरी सतावू लागल्या. मांजराच्या भितीमुळे ती नेहमी बिळातच लपून बसत असे.
त्यामुळे उंदराला व्यवस्थित खाणे मिळत नव्हते आणि इकडे -तिकडे फिरताही येत नव्हते. ती नेहमी अस्वस्थ राहू लागली. त्यामुळे पहिल्यापेक्षा अधिक कमजोर होऊ लागली.
आता उंदीर बनलेली मांजर मरण्याच्या वाटेवर येऊन ठेपली. एके दिवशी ऋषीने तिची अशी अवस्था पाहिली. ऋषीला तिची फार दया आली.


ऋषीने तिला निडरपणे राहण्यासाठी सिंह बनवले. आता सिंह झाल्यानंतर ती सर्व प्राण्यांवर भारी पडू लागली. सर्वजण तिला घाबरु लागले. सिंह बनवल्यामुळे तिला अभिमान होऊ लागला. ती स्वतःला काबूत ठेऊ शकत नव्हती.
अचानक एके दिवशी सिंह भूकेने तळमळू लागला. तब्येत ठिक नसल्यामुळे तो शिकारीसाठी जंगलात जाऊ शकत नव्हता
तेवढ्यात सिंहाची नजर ऋषीवर पडली. ऋषीला खाण्यासाठी सिंह पाठीमागून येऊ लागला. ऋषी त्यावेळी पूजा करण्यासाठी बसले होते. सिंहाची वृती पाहून ऋषीला फार राग आला.
ऋषीने शाप देऊन सिंहाला पुन्हा मांजरीच्या अवस्थेत आणले. आता बिचारी मांजर गपचूप ऋषींच्या पायाजवळ पडून राहू लागली. तिला तिची चूक समजून आली.
तात्पर्य : आपण कधीही आपले हितचिंतकाचे अहित करु नये.



कथा

# सनाथ

एकदा एका घनदाट अरण्यात कपिला गाय हरवली. घरी जाण्याचा रस्ताही चुकली. संध्याकाळ झाली, तशी ती अधिकच घाबरली. हळूहळू काळोख पडू लागला. भीतीने थरथर कापत ती एका झाडाखाली उभी राहिली. तेवढ्यात तिला वाघोबाची डरकाळी ऐकू आली. ती भितीने सैरावैरा धावत सुटली. वाघ तिच्या पाठोपाठ येतच होता. वाघ जवळ-जवळ येऊ लागला. तो झेप घेणार तेवढ्यात तिने एका तलावात उडी मारली. तो तलाव चिखलाने भरलेला होता. तिचे पाय चिखलात खोलवर रुतू लागले. तिच्या पाठोपाठ वाघानेही तलावाच्या दिशेने झेप घेतली. तोही त्या दलदलीत अडकला. त्यालाही बाहेर पडता येईना. त्या दोघांमध्ये फक्त दहा फुटाचं अंतर होतं. एवढ्या जवळ असूनही वाघ तिला खाऊ शकत नव्हता. आता गाईला धीर

उर्वरीत पान क्र.२३ वर

कविता : सुरेश तिर्लोटकर

# बंधू येईल न्हेयाला

सण दिवाळीचा दिवाळीचा हा आला
बंधू येईल गं येईल गं न्हेयाला

माझी आई ग मायेची माऊली
माझी मायेची माऊली
आहे पदराची जन्माची साऊली
मला जन्माची साऊली
जीव आसुसला डोळ भरुन पहायला

माझे बाबा ग दयेचे सागर
थोर दयेचे सागर
माझ्यावरती कृपेची पाखर
आहे कृपेची पाखर
जीव आसुसला डोळे भरुन पहायला


माझ्या ताईच्या गळ्यातला ताईत
मी गळ्यातला ताईत
कुरवाळी ती घेऊन मला मिठीत
घेऊन मला मिठीत
जीव आसुसला ताईला भेटायला

माझा भाऊ ग डोळ्यामधलं पाणी
माझ्या डोळ्यामधलं पाणी
भाऊबीजेला करतो ओवाळणी
जीव करतो ओवाळणी
जीव आसुसला त्याला ओवाळायला

असं माझं ग माहेर माहेर
माझं माहेर माहेर
लाभलं तसं मला बी हे सासर
तसं मला बी हे सासर
माहेर सासर जमलं हे जोडायला

(चाल : पोरी लडू नको बसून मंगलेदारा - कोळी गीत)







# काळा किल्ला

आजची एकसंध दिसणारी मुंबई ही पूर्वी सात बेटांचा समूह होती. ही बेटे ब्रिटीशांच्या ताब्यात आल्यावर त्यांनी आपले पारंपारिक शत्रू सिध्दी, मराठे, पोर्तुगिज ह्यांच्यापासून मुंबईचे रक्षण करण्यासाठी मोक्याच्या जागी किल्ले बांधले. त्यापैकी मिठी नदीवर धारावी येथे बांधलेल्या किल्ल्याला स्थानिक लोक काळा किल्ला म्हणून ओळखतात.

## इतिहास

इ.स.१७३७ मध्ये मुंबईचे गर्व्हनर गेराल्ड ऑन्जीअर ह्यांनी मिठी नदीकाठी किल्ला बांधला. या किल्ल्याचा उपयोग मुख्यत्वे पोर्तुगिजांच्या सालशेत बेटावर आणि मिठी नदीवर नजर ठेवण्यासाठी केला गेला. हा किल्ला काळ्या दगडात बांधला गेला असल्यामुळे स्थानिक लोकांमध्ये काळा किल्ला ह्या नावाने ओळखला जातो. माहीम किल्ला, काळा किल्ला, रिवा किल्ला, सायनचा किल्ला या चार एका रांगेत असलेल्या किल्ल्यांमुळे मुंबई बेटाची उत्तर बाजू संरक्षणाच्या दृष्टीने मजबूत झाली होती.

## पाहण्याची ठिकाणे


सदर किल्ला जगप्रसिध्द धारावी झोपडपट्टीत असल्यामुळे सर्व बाजूंनी अतिक्रमणाने वेढलेला आहे. आता अस्तित्वात असलेल्या अवशेषात प्रथम दर्शनी काळ्या दगडात बांधलेली किल्ल्याची भिंत व त्यावरील किल्ला १७३७ साली बांधल्याची दगडात कोरलेला शिलालेख दिसतो. किल्ल्याच्या आत जाण्यासाठी ८



फूट भिंत चढून जावी लागते. किल्ल्याचा आतील भाग कचऱ्याने भरलेला आहे. त्यातून प्रवेशद्वार, जीना व फांजी यांचे अवशेष दिसतात.

## पोहोचण्याच्या वाटा

काळा किल्ला मध्य रेल्वेच्या सायन स्टेशनच्या पश्चिमेस सायन-बांद्रा लिंक रोडवरुन साधारण १० मिनिटे चालल्यावर ओ.एन.जी.सी. बिल्डींगच्या अलिकडे उजव्या हातास काळा किल्ला गल्ली लागते. या गल्लीच्या टोकाला किल्ला आहे. किल्ल्यात जाण्यासाठी वाट नाही. ८ फुट भिंत चढून जावी लागते.



काळा किल्ला, रिवा किल्ला, सायनचा किल्ला हे तिन्ही किल्ले सायनमध्ये आहेत. हे तिन्ही किल्ले अर्ध्या दिवसात पाहून होतात. स्वत:चे वाहन असल्यास एका दिवसात या तीन किल्ल्यांबरोबर शिवडीचा किल्ला, वरळीचा किल्ला, माहिमचा किल्ला व बांद्र्याचा किल्ला हे पाहता येतात.

❑❑❑

# सनाथ

पान क्र. २० वरुन

आला. त्याच्यापासून तिला धोका नव्हता. ती वाघाकडे पाहून हसली. वाघ म्हणाला, "तुला माझी भीती नाही वाटत?" गाय म्हणाली, "नाही, मी तुला का म्हणून घाबरु?"

"मी या जंगलाचा राजा आहे."

"राजा?" गाय पुन्हा त्याच्याकडे पाहून तुच्छतेने हसली.

"का हसलीस? तू पण चिखलात रुतलेली आहेस."

"मला माझी चिंता नाही. माझा मालक मला उद्या शोधत येईल आणि या दलदलीतून बाहेर काढेल; पण तुला कोण बाहेर काढणार? स्वत:ला राजा म्हणवतोस ना! आता कोण वाचवणार तुला?"


गाईच्या या वाक्याने वाघाचा गर्व क्षणात उतरला. आपण या जंगलाचे राजे आहोत. सारे प्राणी-पक्षी आपल्याला घाबरतात; पण आज आपण निराधार झालो आहोत. आपल्यापेक्षा ही गाय खरंच भाग्यवान आहे. तिला आपल्या मालकाचा आधार आहे. आपण मात्र राजे असूनही अनाथ आहोत.

मित्रांनो, सत्ता, संपत्ती, शक्ती असली म्हणजे आपण सामर्थ्यवान आहोत, आपल्याला कुणाचीही गरज नाही असे काही जणांना वाटते; पण जेव्हा कठीण प्रसंग येतो तेव्हा ज्याच्या शिरावर सद्गुरुचा-परमेश्वराच्या कृपेचा हात असतो तोच त्यातून बचावतो. त्यालाच 'सनाथ' म्हटले जाते. अन्यथा सारं वैभव असून जीवनात सद्गुरु नसेल तर मनुष्य अनाथ आहे.

❑❑❑

# ब्लड ग्रुप म्हणजे काय ? ग्रुपची अदला-बदली होते का ?

जवळ-जवळ शंभर वर्षांपूर्वी जेव्हा मनुष्याला ब्लड ग्रुपची माहिती नव्हती त्यावेळी कोणालाही रक्त देणे कठीण होते. त्यावेळी माहिती नव्हते, की ब्लड ग्रुप काय आहे. सर्वात पहिले १९०१ मध्ये ऑस्ट्रियाचे कार्ल लँडस्टीरनरने शोध लावला, की प्रत्येक मनुष्याचा ब्लड ग्रुप वेगवेगळा असतो. ज्यामुळे जर कोणत्याही एका ब्लडग्रुपच्या व्यक्तीला दुसऱ्या वेगळ्या ब्लडग्रुपच्या व्यक्तीने रक्त दिले तर ते रक्त गोठते. ज्यामुळे लाभाच्याऐवजी नुकसानच होईल. ब्लड ग्रुप आठ पध्दतीचे असतात. ते आहेत ए +, ए -, बी + , बी -, एबी आणि ओ पॉझिटिव्ह किंवा निगेटिव्ह असते. हे सर्वांना माहिती आहे की केवळ समान ब्लड ग्रुप असणाऱ्या व्यक्तीच्या रक्ताची अदलाबदली होत असते. लोकांच्या ब्लड ग्रुपमध्ये अंतर, रक्तामध्ये आढळणारे अणु ज्यांना आपण अँटीजन आणि अँटीबॉडी म्हणतो त्याच्या असण्या आणि नसण्यावर अवलंबून असते. अँटीजन रक्तामध्ये आढळणाऱ्या लाल रक्तकणांच्या स्तरावर आढळते आणि अँटीबॉडी ब्लड प्लाजामध्ये आढळते.





प्रत्येकांमध्ये अँटीजन आणि अँटीबॉडी अणुंचा संयोग वेगवेगळ्या प्रकारचे असतात. साधारणतः लोकांमध्ये आढळणारे ब्लड ग्रुप अनुवांशिक असतात. आतापर्यंत वीस प्रकारचे अनुवांशिक ब्लड ग्रुपचा शोध लागलेला आहे. परंतु एबीओ आणि आरएच फॅक्टर असे दोन महत्त्वपूर्ण तत्त्व आहेत, जे रक्ताच्या घेण्यादेण्यासाठी जबाबदार (ब्लड ट्रांसफ्यूजर) असतात. ब्लड ग्रुपची माहिती आणि ट्रांसफ्यूजनच्या प्रक्रियेच्या शोधासाठी कार्ल लँडस्टीनला १९३० मध्ये नोबेल देण्यात आले.

साधारणतः एक स्वस्थ मनुष्याच्या शरीरामध्ये ४-६ लीटर रक्त असते. साधारण स्थितीमध्ये केवळ समान ब्लड ग्रुपवाले लोकांमध्येच रक्ताचे आदान-प्रदान होत असते. ज्यामुळे असे समजले जाते, की कोणत्याही ग्रुपचे रक्त दुसऱ्याला दिले जाऊ शकत नाही. एबी ग्रुपला समान ग्रुप न मिळाल्यास ओ ग्रुप किंवा दुसरे ग्रुपचे रक्त दिले जाऊ शकते. तसेच ओ ग्रुपला युनिव्हर्सल डोनर मानले जाते. म्हणजे हे ओ च्या बरोबरच साऱ्या ब्लड ग्रुपवाल्या लोकांसाठीही दिले जाऊ शकते.

# आसन : सर्वांगासन

हे एक अत्यंत महत्त्वाचे असे आसन आहे. शरीराला अत्यंत फायदेशीर असे हे आसन आहे. या आसनामुळे शरीराच्या सर्व अवयवांना चांगला व्यायाम मिळत असल्यानेच या आसनाला सर्व-अंग-आसन असे नाव देण्यात आले आहे.



**कृती :** प्रथम उताणे झोपा. त्यानंतर नाकावाटे श्वास आत घेऊन तो रोखून ठेवा. आता दोन्ही पाय हळूहळू वर न्या. त्यानंतर चित्रात दाखविल्याप्रमाणे पाय, नितंब आणि पाठ सरळ रेषेत वर उचला हातांचे कोपरे जमिनीवर टेकवून दोन्ही हातांनी पाठीला आधार द्या. खांदे आणि मान जमिनीवर टेकलेली असू द्या. शरीराचा तोल जाणार नाही याची विशेष काळजी घ्या. त्यानंतर तुमचा स्वाभाविक श्वासोच्छवास चालू ठेवा. दृष्टी पायांच्या अंगठ्यांवर स्थिर ठेवा. यावेळी शरीर थोडे सैल ठेवून पाय डोक्याकडे झुकवा. आता शरीराचा सर्व भार खांद्यावर येईल. ही सर्वांगासनाची अंतिम स्थिती आहे. या स्थितीत साधकाने आपले चित्त गळ्याच्या पुढील भागात असलेल्या थॉयराईड ग्रंथीवर केंद्रित करावे.


हे आसन सकाळी व संध्याकाळी असे दोन्ही वेळा करु शकता. या आसनानंतर लगेच मत्स्यासन करावे. असे केल्याने सर्वांगासनापासून मिळणारे सर्व लाभ प्राप्त होतात. सुरुवातीला काही दिवस हे आसन दोन मिनिटे करावे, त्यानंतर हळूहळू अर्ध्या तासापर्यंत हे आसन करता येते.

## फायदे :

- मनुष्याचे आरोग्य गळ्यात असणाऱ्या थॉयराईड ग्रंथींवर अवलंबून असते. त्या ग्रंथी जितक्या सुदृढ तितके मनुष्याचे आरोग्यपण सुदृढ व निरोगी राहते. या आसनामध्ये थॉयराईड ग्रंथींना चांगला व्यायाम मिळतो. त्यामुळे रक्ताभिसरण, श्वसनक्रिया, पाचनक्रिया, उत्सर्गक्रिया आणि नाडीतंत्र कार्यक्षम राहते.
- हे आसन नियमित केल्याने मेरुदंडामधील नाड्यांच्या टोकांना रक्तपुरवठा भरपूर होतो आणि सुषुम्नेचा प्रवाह डोक्याकडे वाहू लागतो.
- या आसनामुळे पाठीचा कणा लवचिक राहतो. त्यामुळे दीर्घकाळापर्यंत तारुण्यातील जोम टिकून राहतो.
- नाडीसंस्था व पचनसंस्था कार्यक्षम ठेवणारे हे एक मात्र टॉनिक आहे.

❑❑❑

# वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा


सुनिष्ठ कुंभार


स्वरा कोल्हाळे



शौर्य पाटील


वंशराज दिवसे



विवान पाथाळे


श्रिया जाधव


सृष्टी पंकज


मृण्मयी जाधव


वेदांत बुरकुले



सार्थक शिंपी


तनिष्ठा थोरात


पार्थ खोसे


साशा शेख


संज्योत नारखेडे



ईशीता पुंगावकर


उन्नती भोसले


पार्थ काळेगावकर


प्रार्थना थोरात


लिशाना भोंडवे


जान्हवी काळे


प्रीतीका शेरे


शुक्रान नाकत्ती


विहंगा मुकुंद


ओम पिसाळ


संकेत कसबे


प्रज्वल


मधुरता


सुनैना


कशिश


आस्था


अवनीत


क्रिश


साक्षी


स्मित


भूमी, श्रावणी


सुविद्या


सुमरीत

# वैज्ञानिक प्रश्नोत्तरे

प्रश्न : खालून वर जाणारा धूर किंवा वाफ गोलाकार का दिसते ?
उत्तर : हवेतून खाली व वर जाणाऱ्या हवेच्या प्रवाहांमुळे धुराला वा वाफेला गोलाकार गती मिळते म्हणून वाफ किंवा धूर वर जाताना गोलाकार दिसतो.

प्रश्न : काही यंत्राच्या चाकात नळीने पाणी का सोडले जाते ?
उत्तर : काही यंत्रांच्या चाकात घर्षणामुळे उष्णता निर्माण होते. ही उष्णता पाणी टाकल्यामुळे वाफेच्या रुपाने निघून जाते. असे न केले तर यंत्रात बिघाड होईल.

प्रश्न : काही लोक डोळे उघडे ठेवून झोपतात, त्यांना समोरचे दृश्य दिसते का ?
उत्तर : डोळे उघडे ठेवून झोपणाऱ्यांना समोरचे दृश्य दिसत नाही. कारण अशा व्यक्तींचे दृकपटलही झोपेच्यावेळी विश्रांती घेत असते.

प्रश्न : पावसाळ्यात जमिनीवर बऱ्याच प्रकारचे कीटक का दिसतात ?
उत्तर : पावसाळ्यात वरच्या थरातील हवा खालच्या थरापेक्षा थंड असते. त्यामुळे कीटक जमिनीवर येऊन ऊब मिळवतात. म्हणून पावसाळ्यात जमिनीवर बऱ्याच प्रकारचे कीटक दिसतात.

प्रश्न : आगीच्या ज्वाळा किंवा मेणबत्तीची ज्योत पिवळी का दिसते ?
उत्तर : आगीच्या ज्वाळा किंवा मेणबत्तीची ज्योत पिवळी दिसते कारण ही ज्योत कार्बन डायऑक्साईड वायूच्या ज्वलनामुळे तयार होते. त्याचे ज्योतीसमवेत ज्वलन झाल्याने ती पिवळी पडते.

प्रश्न : अणकुचीदार खिळा लाकडात सहज का ठोकला जातो ?
उत्तर : खिळ्याला बारीक टोक असते. ते लाकडावर टेकवून त्याच्या मागील टोकावर हातोडीने आघात केला म्हणजे ते बल अणकुचीदार टोकावर एकत्र होते व खिळा लाकडात सहज घुसतो. या उलट जर खिळ्याचे टोक बोथट असेल तर हातोडीकडून प्राप्त झालेले बल बोथट पृष्ठभागावर विभागले गेल्याने त्याची तीव्रता कमी होते म्हणून बोथट खिळा लाकडात सहज घुसत नाही.

❑❑❑



# एकता


मित्रांनो, एकता हा शब्द तुम्ही खूप वेळा श्रवण केला असेल. जिथे एक पेक्षा जास्तजण सक्रिय असतात त्याला एकता म्हटली जाते. पण ती एकता सकारात्मक असणे आवश्यक आहे. आज ज्या एकतेचं दर्शन होत आहे ती एकता टिकाऊ नाही तर दिखाऊ आहे. साधु-संतांनी ज्या एकतेचा पुरस्कार केला ती एकता विशाल आणि विश्वव्यापी असून त्यात दूरदर्शीपणा होता. कारण त्यांच्याकडे ब्रह्मानुभूतीतून प्राप्त झालेली आत्मिक एकता होती, आणि हीच एकता मानवाच्या शारीरिक, मानसिक आणि आत्मिक उध्दाराला कारण ठरु शकते यावर त्यांचं एकमत होतं. अशी एकता की, ज्यात सर्वांनाच सामावून घेण्याची क्षमता आहे. त्यात जात-पात, प्रांत, बोलीभाषा, एखादं मंडळ किंवा विशिष्ट सांप्रदाय यांच्या मर्यादेची भिंत नाही. जी सार्वभौम आहे, सार्वत्रिक आहे अशा आत्मिक एकतेतूनच सुंदर, निरोगी आणि सदृढ समाजाची निर्मिती होऊन साधु-संतांचा वास्तविक उद्देश पूर्ण होऊ शकतो हे त्रिवार सत्य आहे.

मित्रांनो, बाबा हरदेवसिंहजी महाराज म्हणतात, "To Get together is important but most important is its purpose." एकत्र येणे हे केव्हाही चांगलंच आहे; परंतु त्याहीपेक्षा महत्त्वाचं आहे तो त्या एकत्र येण्यामागचा उद्देश. हजार लोक एकत्र आले यापेक्षा ते कशासाठी एकत्र आले हे जास्त महत्त्वाचं आहे. कारण चार चोर एकत्र येतात ते एखाद्याचं घर फोडण्यासाठी आणि चार पोलीस एकत्र येतात ते एखाद्याचं घर वाचविण्यासाठी. म्हणूनच एकता जर सकारात्मक असली तर लाभदायक ठरते.

मित्रांनो, याचं साक्षात प्रमाण निरंकारी संत समागम. यात विविध जाती, धर्म, संस्कृती, पंथ, सांप्रदायाचे लोक एकत्र येऊन आपण सर्व एकाच परिवाराचे अंग आहोत हे साध्य करुन दाखवत आहे. मिशनच्या विचारप्रणालीनुसार साकार सद्‌गुरुच्या माध्यमातून झालेल्या निराकार परमात्म्याच्या अनुभूतीतूनच एकतेची व्यापक आणि विशाल भावना मनात रुजू शकते. जे समस्त मानव समाजासाठी निश्चितच कल्याणकारक आहे. प्रत्येक युगात हेच वास्तव साधु-संतांनी जगाला समजाविण्याचा प्रयत्न केला. त्यांनी प्रतिपादन केलेलं हे सत्य कथन म्हणजे स्पष्ट रुपाने मानव एकतेचा पायाभूत सिध्दांतच आहे.

संग्राहक : अंकित चं. जाधव

- संदर्भ : परमार्थिक विवेचन (पुस्तक)



# बीड

सीमा : उत्तरेस - औरंगाबाद व जालना जिल्हा, पूर्वेस - परभणी व लातूर जिल्हा, दक्षिणेस - उस्मानाबाद जिल्हा, पश्चिमेस - अहमदनगर जिल्हा

नद्या : गोदावरी, सीना, मांजरा, कुंडलिका, वाण, सिंदफला, गुणवती, बिंदुसरा, सरस्वती, वाण

खनिजे : बांधकामासाठी लागणारा दगड

प्रमुख शेतकी उत्पादने : ज्वारी, बाजरी, गहू, ऊस, गळिताची धान्ये

धरणे : गोदावरी नदीवरील मातीचे धरण (माजलगाव); तसेच मांजरा, बिंदुसरा, सिंधफणा व वाण या नद्यांवर धरणे आहेत.

## विशेष माहिती -

पांडवकाळात बीडला चंपावतीनगर असे संबोधले जाई.

भारतातील बारा ज्योतिर्लिंगापैकी वैजनाथ हे ज्योतिर्लिंग परळी शहरात आहे. हे मंदिर देवगिरीच्या यादवांच्या श्रीकरणाधिप हेमाद्री याने बांधले.

अंबाजोगाई येथील योगेश्वरी मंदिर हे महाराष्ट्रातील साडेतीन शक्तिपीठांपैकी एक आहे.

मराठी भाषेतील पहिला ग्रंथ विवेकसिंधू लिहिणारे आद्यकवी मुकुंदराज यांची अंबाजोगाई येथे समाधी आहे.

बीड जिल्ह्यात नायगाव येथे महाराष्ट्रातील पहिले मयूर अभयारण्य आहे. येथील अभयारण्यात १० ते १२ हजार मोर आहेत.

मराठवाड्यातील पहिले औष्णिक विद्युत केंद्र ठरण्याचा मान परळी येथील औष्णिक विद्युत केंद्रास मिळाला आहे.

बीड जिल्ह्यातील ऊसतोड कामगारांची संख्या जास्त असल्यामुळे या जिल्ह्याला ऊसतोड कामगारांचा जिल्हा असे ओळखले जाते.

बीड जिल्ह्यात बालाघाटच्या रांगांत लमाण ही जात आढळते.

बीड - कंकालेश्वर मंदिर, पीर बालाशाह व मन्सुरशाह यांचा दर्गा

केज - समर्थ रामदास स्वामींचे एक शिष्य उध्दव स्वामी यांची येथे समाधी आहे.

धारुर - डोंगरी किल्ला, हुतात्मा स्मारक, सोने-चांदीची व्यापारी पेठ.

पाटोदा - १०० मीटर उंच सौताडा धबधबा

येळंब - महादेवाचे मंदिर, खुदाबक्ष पिराचा दर्गा

❐❐❐

# निरंकार प्रभूशी नातं




भक्त महापुरुषांच्या हृदयात नेहमी प्रेमच प्रेम असतं. निराकार प्रभुशी नातं जुळल्यानेच हे प्रेम हृदयात प्रवेश करतं. जितका काळ प्रभु दातारशी मन एकरुप होतं, हृदयात प्रेमाचा प्रवाह प्रवाहित होत राहतो. जेव्हा आम्ही याला विसरतो त्याक्षणी मनात वैर, ईर्ष्या आणि अभिमानाची भावना येऊन जाते. आम्हाला वाटू लागतं, की माझ्यामध्ये फार ताकद आलीय. मी जसं म्हणेन तसं सर्वांनी करावं. सर्वात मोठा मालक प्रभू परमात्मा आहे. हा लहान लेकराकडूनही मोठं काम करवून घेऊ शकतो, हे आम्ही विसरुन जातो. ज्याक्षणी या प्रभुची अनुभूती टिकून असते त्याक्षणी मन निर्मळ राहतं, शीतल राहतं, विनम्र राहतं.

आज जगातला माणूस संकुचिततेच्या सीमारेषेतच बांधला जात आहे. कोणी भाषेची भिंत उभी करतो तर कोणी जातीपातीच्या भिंती उभ्या करत आहे. या भिंतीच्या बाहेर पडून विशाल हृदय बनवा, सगळ्यांना प्रभूची संतान मानणं, अवघ्या सृष्टीला प्रभुची देन मानणं, जोवर अशी दृष्टी बनणार नाही तोवर वैर, ईर्ष्या दूर होणार नाही. तोवर हे मन पतनाकडेच जातं. मनाची अवस्था तेव्हाच उच्चतेला प्राप्त होते. जेव्हा याला प्रभू परमात्म्याची ओळख होते. जेव्हा संत महापुरुषावर प्रेम जडतं. रंग, भेद, जातीपातीचा भेदभाव न बाळगता भक्त सर्व माणसांशी प्रेम करतात. ते नेहमी गुणाचे ग्राहक असतात. प्रत्येक माणसात दातारने काही सद्गुण भरले आहेत पण आम्ही जर अवगुण पाहत राहिलो तर कोणीही पूर्ण सापडणार नाही. जर एखाद्याचं कोणाशी देणं घेणं स्वच्छ असेल तर त्याचं बोलणं कडवट. अशाप्रकारे कोणाची कशी नजर तर कोणाची कशी नजर. म्हणून जर माणूस माणसाचे अवगुण पाहत बसला तर काहीच प्राप्त करु शकणार नाही. आपल्या जीवनाला महान बनवू शकणार नाही. महान तोच बनतो जो असं मानतो, की दुसऱ्यात गुणच गुण आहेत, माझ्यात अवगुण आहेत.

(- सद्‌गुरु बाबा हरदेवसिंहजी महाराज )



# हसा मुलांनो हसा



ज्योतिषी : गणूशेठ, तुमच्या कुंडलीमध्ये पैसाच पैसा आहे.
गणूशेठ : हो, ते सगळं ठीक आहे; पण त्या कुंडलीतला पैसा माझ्या बँकेत कसा ट्रान्सफर करायचा ते सांगा.



घरी आलेले पाहुणे राजूला म्हणाले देव कुठे असतो हे मला सांगितलेस तर तुला एक सफरचंद देईन. त्यावर राजू म्हणाला, देव कुठे नाही हे मला सांगितले तर एकच काय तुम्हाला हवी तेवढी सफरचंद देईन.



एका इंजिनीअरिंग कॉलेजमध्ये प्रवेश घेण्यासाठी एक तरुण आला. ऑफीस उघडायला थोडा वेळ बाकी असल्याने तो गेटजवळच्या भेळवाल्याकडे भेळ खाण्यासाठी गेला. सहज म्हणून त्याने भेळवाल्याला विचारले, "हे कॉलेज कसं आहे ?" भेळवाला म्हणाला, "फार चांगलं कॉलेज आहे हे ! मी देखील याच कॉलेजमधून इंजिनिअरींग पास केलंय."



चिंटू तीन महिन्यांपासून शाळेत आला नाही म्हणून वर्गशिक्षिका चिंटूच्या घरी विचारपूस करायला गेल्या.
शिक्षिका : चिंटू शाळेत का येत नाही ?
चिंटूची आई : अहो, काय करणार तीन महिन्यांपूर्वी तो खेळता खेळता हरवला होता म्हणून त्याचा फोटो व्हॉटस् ॲप वर टाकला होता. नंतर तो सापडला. पण आता मात्र शाळेत जायला निघाला की लोक त्याला पकडून घरी आणून सोडतात आणि बक्षीस मागतात.



गाय, म्हैस आणि रेडा एका मंदिराशेजारी रवंथ करत बसले होते. मंदिरातून येणारे भाविक गाईला हात लावून नमस्कार करुन पुढे जात होते. ते पाहून म्हैस रेड्याला म्हणाली, "ते बघ, सगळी माणसं गाईच्या कपाळावर टपली मारुन जाताहेत. पण मला मात्र हात लावायची कुणाची हिम्मत नाही. आपला दराराच आहे तसा." त्यावर रेडा फुशारकी मारत म्हणाला, "अगं, तुझा दादा आहे ना इथं, म्हणून कुणाची हिम्मत होत नाहीये,

गोंधळे मास्तर विहिरीत आंघोळ करण्यासाठी उतरले. पायरीवरचा पाय निसटून ते खोल पाण्यात पडले. त्यांना पोहता येत नव्हते. त्यांना बुडताना पाहून बन्या अंगातला शर्ट काढून हवेत गरगर फिरवत आनंदाने ओरडत पळत सुटला - 'एऽऽ परश्या, उद्या शाळेला सुट्टी.....'

आई : चिंटू, लवकर आंघोळ करुन घे, नाहीतर शाळा बुडेल!
(थोड्या वेळाने) चिंटू, अरे अजून आंघोळ का केली नाहीस ?
चिंटू : अगं आई, या बादलीभर पाण्यात शाळा कशी बुडेल ते पाहतोय.

दूधवाला : (एका मुलास) बाळ, खोटं कधी बोलू नये.
मुलगा : तुम्ही तर नेहमीच खोटं बोलता. कोणी विचारलं दुधात पाणी मिसळलं आहे का ? तुम्ही चक्क नाही म्हणून सांगता.
दूधवाला : ते खोटं नसतं. ते खरंच असतं कारण आम्ही दूधात पाणी मिसळत नाही; तर पाण्यात दूध मिसळतो.

# एकनाथपंतांना चमत्कार दाखविला

पैठणास एकनाथपंत नावाचे एक ब्राह्मण राहत असत. ते रोजगाराकरिता म्हणून घरातून बाहेर पडून देशावर गेले व तेथे वकिली करुन तीन-चार वर्षात एकसष्ट होन त्यांनी शिलकीत ठेवले. तेवढे घेऊन ते आपल्या घरी पैठणला येण्यासाठी निघाले. रामदासस्वामी हे एक मोठे साधू आहेत, अशी कीर्ती त्यांच्या कानावर आली होती. तेव्हा मार्गामध्ये त्यांनी असा विचार केला, की आपणही जाऊन समर्थांचे दर्शन घ्यावे व आपल्या गावात जसे पूर्वी एकनाथ महाराज होऊन गेले, त्यांच्याप्रमाणे ह्यांच्यापाशीही काही चमत्कार आहेत, की काय ते पाहावे म्हणून ते चाफळला आले. परंतु मठात समर्थ नव्हते. म्हणून कल्याणस्वामींना घेऊन एकनाथपंत रामघळीस गेले. कल्याणस्वामींनी एकनाथपंतांची हकीकत समर्थांना निवेदन केली.

ते सर्व ऐकून समर्थ 'उत्तम आहे' असे म्हणाले. व "आता दोन प्रहर होत आले आहेत, तर स्नानसंध्या करुन रघुपतींचा प्रसाद घेऊन मग जावे," अशी एकनाथपंतांना आज्ञा केली. एकनाथपंत मनात म्हणाले, येथे तर फक्त डोंगर आहे आणि नैवेद्य कशाचा बरे होईल? ते स्नानसंध्या करायच्या तयारीला लागले.

समर्थांनी कल्याणस्वामींना आज्ञा केली, "त्या जाळीपलीकडे सर्व साहित्य आहे, ते घेऊन स्वयंपाक करणे." कल्याण व एकनाथपंत यांनी पाहिले तो तिघांपुरते सर्व साहित्य होते. पाने तीन व द्रोण सहा होते. तेवढे घेऊन कल्याणस्वामी स्नान करुन स्वयंपाकास लागले. समर्थांचेही स्नान झाले. इतक्यात साठ ब्राह्मण समर्थांचा शोध करीत करीत तेथे दर्शनासाठी येऊन पोचले. नमस्कार वगैरे होऊन सर्व मंडळी बसली.

"आपण कोठून आलात?" समर्थांनी त्यांना प्रश्न केला.

"शिवाजी महाराज यज्ञ करीत आहेत, तिकडे निघालो होतो. तो सहज मार्गामध्ये श्रींचे दर्शन घ्यावे म्हणून इकडे आलो. दर्शनाचा लाभ घडला, आनंद झाला," ब्राह्मण म्हणाले.


समर्थ त्यांना म्हणाले, "आता दोन प्रहर झाले आहेत. रघुपतींचा नैवेद्य तयार आहे. भोजन करुनच जावे."

ब्राह्मण म्हणाले आमचा समुदाय मोठा आहे, त्यावर समर्थ म्हणाले "समुदाय मोठा असला म्हणून काय झाले? रघुपती सर्वांहून मोठे आहेत. नेवैद्य करुनच जावे."

ही विनंती ब्राह्मणांना काही मोडवेना. पण ते

उर्वरीत पान क्र.४३ वर






# ग्रेट पिरॅमिड

इजिप्त देश म्हटले, की डोळ्यांसमोर उभी राहतात ती दोन नावे - एक म्हणजे जगप्रसिध्द अशी सर्वात लांब 'नाईल' नदी आणि दुसरे म्हणजे जगविख्यात पिरॅमिड! जगातील सात प्राचीन आश्चर्यांपैकी सर्वात जुने व आजमितीसही अस्तित्वात असलेले अद्‌भूत शिल्प म्हणजे पिरॅमिड! जगप्रसिध्द नाईल नदीच्या तीरावर हे पिरॅमिड बनविण्यात आलेले आहेत. येथे आढळणाऱ्या सर्व पिरॅमिडस्‌ची निर्मिती ही प्राचीन इजिप्तिशियन राजाराणींचे मृतदेह 'ममी' स्वरुपात कायमस्वरुपी जतन करण्यासाठी केलेली होती.

'द ग्रेट पिरॅमिड' हा गिझा येथे असून हा जगातील सर्वात उंच पिरॅमिड मानला जातो. इजिप्तमधील खुफू राजाने याची निर्मिती ख्रिस्तपूर्व २५६० च्या दरम्यान केली. या पिरॅमिडच्या बांधणीसाठी जवळजवळ वीस वर्षांचा काळ लागला. हा पिरॅमिड उभारण्यासाठी २ कोटी ५० लाख दगड वापरण्यात आले. जेव्हा तो बांधला तेव्हा त्याची उंची होती ४८१ फूट! परंतु कित्येक शतके सर्वाधिक उंच इमारतीचा मान मिरविल्यानंतरच्या हजारो वर्षात त्याची धूप झाल्यामुळे आता त्याची उंची ४५१ फूट एवढी झाली आहे. या पिरॅमिडची प्रत्येक बाजू २२९ मीटर (७५१ फूट) एवढी लांब आहे.

या पिरॅमिडचे मुख्य प्रवेशद्वार हे उत्तर दिशेकडून आहे. या पिरॅमिडच्या आत प्रवेश करण्यासाठी एक गुप्त मार्ग आहे. पिरॅमिडच्या बरोबर मध्यभागी राजाचा मृतदेह ठेवलेला आहे. मिस्त्र संस्कृतीतील प्रथेनुसार मृतदेहासोबत अनेक किमती वस्तूही तेथे ठेवल्या जात असत. या मौल्यवान वस्तूंमुळेच पिरॅमिडची अनेकदा लूट करण्यात आली. गिझा येथील या ग्रेट पिरॅमिड शेजारी अनेक छोटे पिरॅमिडस् आहेत. खाफ्रेचा पिरॅमिड व स्फिंक्स ही देखील इजिप्तमधील आवर्जून पाहावीत, अशी शिल्पे आहेत.




# किट्टी

चित्रांकन व लेखन : अजय कालडा





मित्रांनो चला, आपण फुगे विकत घेऊया.
हो, हो चला
मित्रांनो आता आपण रोलर कोस्टरवर झोके घेऊया. मी ऐकलं आहे, की तो पाळणा फारच धोकादायक आणि भयानक आहे.
चला चला मग तर फारच मजा येईल.
नाही. मी नाही येणार. मला आईने त्यावर बसण्यास मनाई केली आहे.
किट्टी, तू किती घाबरट आहेस. आईने सांगितलं म्हणून तू घाबरतेस.


अगं किट्टी यात घाबरण्यासारखं काय आहे. जर आपण पाळण्यात बसलोच नाही तर मजा कशी येणार ?
चला तर आपण सर्वजणं ह्या पाळण्यात बसूया.
नाही, नाही मी नाही बसणार. तुम्ही सारे बसा.
आई !!! मला खूपच भीती वाटतेय.
मी तुम्हाला आधीच सांगितलं होतं, की तो पाळणा फारच धोकादायक आहे. बरं झालं मी पाळण्यात बसले नाही ते.


आई, तू जसं सांगितलंच तसंच मी केलं. मी पाळण्यात बसलेच नाही. बाजूला उभी होते.


कदाचित आपण देखील किट्टीचे म्हणणं ऐकलं असतं तर भितीमुळे आपली तब्येत देखील बिघडली नसती आणि जत्रेचा आनंद देखील घेतला असता.

# पद्मशिला तिरपुडे





ही गोष्ट म्हटली तर अगदी सोपी आणि म्हटली तर खूप काही सांगून जाणारी. एका मजूरी करणाऱ्या माणसाची पत्नी गावकुसाबाहेरच्या पालावर राहणाऱ्या या कुटुंबाने जगासमोर आदर्श निर्माण केला आहे. दोन लहानगी लेकरं घेऊन संसाराचा गाडा ओढताना या पती-पत्नीने यातून बाहेर पडण्याची जी असामान्य धडपड केली तिला आज यश आले आहे. त्या मजूराच्या पत्नीने पदवी परीक्षा उत्तीर्ण तर केलीच पण त्यानंतर तिने चक्क पोलीस दलात अधिकारी पदाची नोकरी मिळवली आहे. ही कहाणी आहे पद्मशीला तिरपुडे या सामान्यांतील असामान्य महिलेची !

महाराष्ट्र पोलीस अकादमीत नुकत्याच झालेल्या उपनिरीक्षकांच्या तुकडीचा दीक्षांत सोहळा या यशस्विनीसाठी आयुष्यातील परमोच्च आनंदाचा-अभिमानाचा ठेवा ठरलाच तसाच तो अनेकांना प्रेरणा देणारा क्षण होता. तो

अनुभवण्यासाठी तिने प्रचंड संघर्ष केला. त्याचीच ही सुखद परिणती होती. राज्याच्या पोलीस दलास आजवर उपनिरीक्षक दर्जाचे २४ हजार अधिकारी देणाऱ्या महाराष्ट्र पोलीस अकादमीची यंदाची १०८ वी तुकडी अनेक बाबतीत वैशिष्ट्यपूर्ण ठरली.

या तुकडीने सर्वाधिक १५४४ फौजदार दिले आणि त्यात १२० महिला पोलीस अधिकारी आहेत. त्यापैकीच एक असलेल्या पद्मशीला यांचा दहा वर्षातील प्रवास अनेकांना प्रेरणादायी आहे.

मूळच्या भंडारा जिल्ह्यातील असलेल्या पद्मशीला रमेश तिरपुडे यांचा त्याच जिल्ह्यातील वाळकेश्वरजवळच्या पहेला गावातील पवन तुकाराम खोब्रागडे यांच्याशी दहा वर्षापूर्वी प्रेमविवाह झाला होता. त्या सांगतात, पोलीस अधिकारी व्हायचं स्वप्न पूर्ण झालं याचा आनंद आहे. पण त्याचं सगळं श्रेय पतीलाच आहे. त्यांनी खूप सोसलंय, हमाली केली, समोसे विकले, मजुरी केली. त्यांनी घेतलेले सगळे कष्ट आज कामाला आले.

पद्मशीला तिरपुडे (पोलीस उपनिरीक्षक) सांगतात, आयुष्यात एक दिवस असा आला, की घरात अन्नाचा दाणाही नव्हता. उसने आणलेले पन्नास रुपये बाजारात हरवले. खूप वाईट वाटले. खूप रडलो तसेच उपाशी झोपलो पण त्या दिवशीच निश्चय केला, की मोठ्ठं अधिकारी व्हायचं. पद्मशीला शिकल्या अन् मोठी अधिकारी व्हायचं या स्वप्नासाठी त्यांनी खूप कष्ट केले. घरची परिस्थिती फारच हलाखीची होती. पद्मशीला यांचे पती पेव्हर ब्लॉकचे मजुरीचे काम करुन घर चालवत होते.

नाशिकच्या गोदावरीच्या काठावरील एका पालामध्ये दोन लहानग्यांसह त्यांनी संसार थाटला होता. पण त्यांच्या मनात यातून बाहेर पडण्याची भरारी घेण्याची जिद्द होती. त्यांना त्यांच्या पतीची साथ होती. त्यामुळे अनेक आव्हानांशी लढत त्यांनी पदवीपर्यंतचे शिक्षण घेतले. त्यानंतर एमपीएससीच्या परीक्षेत उत्तीर्ण होत त्यांची निवड राज्य पोलीस दलात आज उपनिरीक्षक पदावर झाली आहे.

जीवनात वाईट स्थिती आली म्हणून तिथेच न थांबता त्यांनी दुर्दम्य इच्छाशक्तीच्या बळावर चक्क पोलीस फौजदार होऊन अनेक जणींसमोर आदर्श तर ठेवलाच आहे पण स्वत:च्या जीवनाला असामान्य वळण देण्याची किमया साधली आहे! त्यांच्या या कर्तृत्वाला सलाम!

(साभार)

❒❒❒

## क्षमस्व

ऑक्टोबर २०१८ मधील अंकात पान क्र.४१ वरील वाचन प्रेरणा दिवस या मथळ्याखाली १६ ऑक्टोबर रोजी भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस आहे; असे चुकून लिहिले गेले आहे तरी १६ ऑक्टोबर ऐवजी १५ ऑक्टोबर असे वाचन करावे.

– संपादक



कथा

# जशास तसे

भोळाराम नावाचा एक श्रध्दाळू भक्त एका गावात राहत होता. नावाप्रमाणेच तो भोळा होता. त्याची बायको यमी हीदेखील श्रध्दाळू होती. त्याला कुणाचंही दु:ख पाहवत नसे. प्रत्येकालाच तो मदत करत असे. एकदा तो जेवायला बसणार तोच एक भुकेलेला मुलगा दारात भाकरी मागण्यासाठी आला. भोळारामला त्याची खूप दया आली. त्याने आपल्या पुढ्यातील जेवणाचे ताट त्याला दिले. स्वत: मात्र उपाशी राहिला. त्याने दोन-चार माणसांचा स्वयंपाक जास्त बनवत जा असे आपल्या बायकोला सांगितले. रोज पाच-सहा भुकेलेली माणसं त्याच्या घरी जेवून जात. त्याच्या

या दयाळू स्वभावाचा फायदा काही ऐतखाऊ माणसं घेऊ लागली. खाणाऱ्यांची गर्दी वाढू लागली. भोळारामच्या पत्नीला ही गोष्ट खटकत असे; पण भोळाराम मात्र कुणालाही नाही म्हणू शकत नव्हता. आता आपल्यालाच काहीतरी केले पाहिजे असे तिने ठरवले. तिने आपल्या पैलवान भावाला बोलावून घेतले.

एके दिवशी तिने आपल्या घराच्या मागील दारी धारदार कुऱ्हाडी, कोयते आणि पूजेचं साहित्य आणून ठेवलं. चांगली धडधाकट माणसं जेवायला आलेली पाहून ती त्यांना म्हणाली, "चला, जेवणाची सर्व तयारी झाली आहे. मागील दारी जाऊन आपण हात-पाय धुवून घ्या." ऐतखाऊ मंडळी उठली आणि मागील दारी गेली. तिथे ठेवलेली धारदार कुऱ्हाड, पूजासामग्री आणि कोयता हातात घेऊन बसलेला पैलवान पाहून घाबरतच त्यांनी यमीला विचारलं, "ताई, हे काय आहे?" यमी म्हणाली, "आमच्या देवीला चांगला धष्टपुष्ट नरबळी द्यायचा आहे. त्यामुळे ही सर्व तयारी आहे."

ऐतखाऊ मंडळींची तर बोबडीच वळाली. मागच्या दाराने सगळे चूपचाप पळून गेले. यमीने मग खऱ्या गरजू, भुकेलेल्या माणसांना पोटभर जेवू घातलं. ऐतखाऊ मंडळी पुन्हा भोळारामच्या घराकडे फिरकलीसुध्दा नाही.

अशाप्रकारे जशास तसे वागून यमीने ऐतखाऊ मंडळींची चांगलीच खोड मोडली.

मित्रांनो, आपला स्वभाव दयाळू, कणवाळू, उपयोगी पडणारा असावा. पण त्याचा गैरफायदा कोणी घेत असेल तर वेळीच सावध देखील व्हायला पाहिजे.

❑❑❑

## *एकनाथपंतांना ...* पान क्र. ३४ वरुन

मनात म्हणू लागले, येथे तर अवघ्या तीन जणांना पुरेल एवढाच स्वयंपाक दिसतो आणि आम्ही साठ जण जेवणार कसे? पण असो. स्वामींचा आग्रह आहे, तेव्हा काय चार चार शिते वाटणीस येतील ती खाऊन वाटेस लागू.

इतक्यात एकनाथपंतांनी जाऊन समर्थांस विनंती केली, की "द्रोण सहा असून पाने तीनच आहेत. आता ह्यांचे कसे करावे?"

समर्थांनी, "काही चिंता नाही, असतील तीच ठेवू लागा म्हणजे पुरतील" असे सांगितले. त्याप्रमाणे एकनाथपंत तीन पाने घेऊन मांडू लागले. तो साठ ब्राह्मणांना पुरुन आणखी तीन पाने शिल्लक राहिली. त्यातील एकावर नैवेद्य ठेवून एक कल्याणांसाठी ठेवले. द्रोणांची गोष्टही तशीच. अन्नही तसेच. सर्वांना यथेच्छ पुरुन सर्वांची व्यवस्थित भोजने झाली. साहित्यात तीनच विडे होते. ते घेऊन एकनाथपंत देऊ लागले तो तेही सर्वांना पुरले.

❍ **क्रमशः**

सत्संगाप्रति असणारी ओढही विशेष महत्त्वपूर्ण आहे. ज्याला सत्संगाची ओढ आहे तो कोणता बहाणा बनवत नाही, तर सत्संगासाठी वेळ काढतोच काढतो. अन्य कामांना मागे ठेवून सत्संगालाच प्राधान्य देतो. माहिती होताच सत्संगाला प्राधान्य देवून सत्संगाला पोहोचण्याचा प्रयत्न करतो.

**- सद्गुरु माता सुदीक्षा सविंदर हरदेवजी महाराज**



## तुम्हाला माहिती आहे का?




# सर्वात पहिले ग्रीटींग कार्ड!

गेल्या शतकापर्यंत ख्रिश्चन धर्मिय ख्रिसमस सणासाठी आपल्या मित्र व नातेवाईकांना पत्रे लिहून आपल्या शुभेच्छा पाठवित असत. सन १८४३ मध्ये इंग्लंडचा एक व्यापारी हेन्री कोल याला सुचले, की पत्र लिहिण्याऐवजी सचित्र कार्ड पाठवून शुभेच्छा व्यक्त कराव्यात. त्याने जॉन हॉर्सले नावाच्या चित्रकाराकडून एक चित्र बनवले व त्या चित्राची कार्डे आपल्या नातेवाईक व मित्रांना शुभेच्छा म्हणून पाठविली. या कार्डाची छपाई ही हॉर्सले याने आपल्या पैशातून केली होती. पहिल्यांदा त्याने हजार कार्डे छापली. काही त्याने वापरली व बाकीची दुकानात विक्रीला ठेवली. लोकांनी ती हातोहात खरेदी केली. आज जगभरात शुभेच्छाकार्डांची अब्जावधी डॉलर्सची उलाढाल होते. याची सुरुवात तर ख्रिसमसच्या शुभेच्छेतून झाली, परंतु आता प्रत्येक प्रसंगासाठी वेगवेगळ्या ग्रीटींगचा वापर होतो.

नववर्ष, वाढदिवस, लग्न, लग्नाचा वाढदिवस, साखरपुडा, दिवाळी, होळी इ. सारखे सण उत्सव यावेळी ग्रीटींग कार्डे वापरली जातात. याशिवाय परीक्षेतील यश, प्रमोशन, गेट वेल सून, नव्या बाळाचे आगमन इ. प्रसंगी ग्रीटींग कार्ड देण्याचे प्रस्थ वाढत चालले आहे. या ग्रीटींग कार्डद्वारे तुम्ही मनातील भावना सुंदर रुपात सादर करु शकता. आज बाजारात वेगवेगळी कार्डे उपलब्ध आहेत. कार्डाची योग्य निवड ही तुमच्या भावना व्यक्त करते. ज्याला कार्ड पाठवायचे त्याच्यापर्यंत तुमच्या भावना पोचविल्या जातात.

आजच्या या धावपळीच्या युगात आपण नातेवाईक, मित्र व परिचितांना समक्ष भेटू शकत नाही. त्यावेळी ही ग्रीटींग कार्डेच आपल्यासाठी संदेशदूताची भूमिका बजावतात. कार्डावर योग्य संदेश लिहा व खाली तुमचे नाव, बस्स! तुमच्या भावना अगदी समर्पक शब्दात त्या व्यक्तीच्या मनात प्रवेश करतील.

शुभेच्छा देणारी ही ग्रीटींग्ज जीवनात नवे रंग भरतात व नात्यांमधली वीण आणखीनच घट्ट करतात.

# आली दिवाळी

परीक्षा संपली सुट्टी मिळाली, उंबरठ्यावर दिवाळी आली
लाडू चिवडा करंजी चकली, आईची खाशी धांदल झाली

आम्हा मित्रांचा किल्ला सजला, खेळणी लाविता खूपच नटला
सैनिक जवान घेऊन साथीला, खांद्यावर बंदूक हाती भाला

बाबांनी केली बर्फाची शिखरे, त्यावर तोफांची तैनात बरे
देशाचे जवान आमचे फाकडे, सीमारक्षक असती निधडे

दिवस उगवला दीपावलीचा, उटणे लावून आंघोळीचा
ओवाळीती मग आई ताई, आमची नुसती खाण्याची घाई

आकाश कंदील अंगणी लावू, पणत्यांनी सारे घर सजवू
फटाके नाही फोडायचे, प्रदूषण आपण टाळायचे



कविता : सौ. जयमाला गोपीनाथ पवार
(सांगली)

# सामान्य ज्ञान



१) ‘राजीव गांधी खेलरत्न’ पुरस्कारासाठी कोणत्या क्रिकेटपटूची निवड करण्यात आली ?

अ) धोनी ब) तेंडूलकर क) कोहली ड) जडेजा

२) विशाखापट्टणम या शहराचे नाव आधी कोणते होते ?

अ) वॉल्टेयर ब) विजयवाडा क) मद्रास ड) बेजावाडा

३) शिवरायांनी भोरप्या डोंगरावर बांधलेल्या किल्ल्याचे नाव काय ?

अ) राजगड ब) प्रतापगड क) प्रचंडगड ड) सिंहगड

४) झाडे दिवसा कोणता वायू घेतात ?

अ) ऑक्सिजन ब) हायड्रोजन क) कार्बन डायऑक्साईड ड) नायट्रोजन

५) शरीराला कोणत्या दोन अन्न पदार्थामुळे उर्जा मिळते ?

अ) पिष्टमय पदार्थ व प्रथिने ब) स्निग्ध पदार्थ व जीवनसत्त्वे

क) जीवनसत्त्वे व प्रथिने ड) पिष्टमय पदार्थ व स्निग्ध पदार्थ

६) बॉम्बे हाय मधून कशाचे उत्पादन मिळते ?

अ) खनिजे ब) पेट्रोलियम पदार्थ क) स्फोटके ड) रॉकेल

७) चौदावे रत्न याचा अर्थ

अ)चौदा क्रमांकाचे रत्न ब) चौदा रत्नांचा हार क) गारगोटी ड) मार

८) हनुमंत हा कोणाचा पुत्र होता ?

अ) वायु ब) आकाश क) अग्नि ड) वरुण

९) ‘बारा बलुतेदार आणि स्वयंपूर्ण खेडी’ दाखवणारे सिध्दगिरी ग्रामजीवन म्युझीअम कोठे आहे ?


अ) मुंबई ब) कोल्हापूर क) यवतमाळ ड) बुलढाणा

१०) कसोटी पदार्पणातच शतक झळकवणारा कमी वयाचा मराठी क्रीकेटपटू कोण ?

अ) पृथ्वी शॉ ब) विनोद कांबळी क) सचिन तेंडूलकर ड) प्रवीण आमरे

उत्तरे इतरत्र





# तीक्ष्ण नजरेची कपाशी

अतिशय दिमाखदार दिसणाऱ्या या घारीला इंग्रजीमध्ये ब्लॅक विंग काईट असं म्हणतात. हिचा पोटाकडील भाग अगदी पांढराशुभ्र आणि कापसासारखा मऊ दिसणारा असतो, म्हणूनच या घारीला कापशी असं म्हटलं जातं. भारतात सर्वत्र आढळणारी ही घारीची एक जात असून याच्या अनेक पोटजाती आहेत. भारताशिवाय सर्व आशियाई प्रदेशांमध्येही ही घार आढळते. हा पक्षी अगदी समुद्र सपाटीपासून ३००० ते ४००० मीटर उंचीवर सुध्दा आढळतो.

साधारणतः आकारानं थोडी लहान असणारी ही पांढरी घार कावळ्याएवढ्या आकाराची असते. दिसायला सुंदर असणारी ही घार मनुष्यवस्तीजवळही आढळते. या घारीचा मुख्य रंग पांढरा-राखाडी असतो. सफेद छाती आणि पोट असलेली ही घार कापसासारखी मऊ असते. पंख राखाडी रंगाचे व खांदे काळ्या रंगाचे असतात. या पांढऱ्या घारीचे डोळे लालभडक किंवा पिवळे असतात व डोळ्याभोवती काळी वर्तुळं असतात. तिच्या छोट्या परंतु अणकुचीदार चोचीमुळे भक्ष्य फाडण्यास व सावज घट्ट पकडून ठेवण्यास मदत होते. या घारीचं वैशिष्ट्यं म्हणजे जबरदस्त मजबूत पकड असलेले पिवळसर पाय. खरंतर ही घारीचीच लहानशी जात असली तरी या पांढऱ्या घारीत व सामान्य घारीत खूप फरक असतो.

गवताळ प्रदेश आणि उतार असलेल्या टेकड्यांची जंगलं असणाऱ्या ठिकाणी या घारीचं हमखास दर्शन होतं. या घारीची नजर अतिशय तीक्ष्ण असते. यामुळे विजेच्या तारेवर किंवा उंच फांदीवर बसून टेहळणी करणारी घार आपल्याला हमखास दिसते. जमिनीवर कुठेही बारीकशी हालचाल झाली तरी ही घार सूर मारुन झेप घेत आपलं सावज सहज टिपते. ही या घारीची शिकारीची सामान्य पध्दत असून तिचं शिकार करण्याचं आणखी एक वैशिष्ट्यं आहे. ही घार उंच हवेत एकाच जागी हेलिकॉप्टरप्रमाणे फिरत राहून आपल्या सावजाचा अंदाज घेते. अशाप्रकारे कित्येक सेकंद हवेत पंख फडफडवत एकाच जागी ती उभी राहू शकते. काही शिकारी पक्ष्यांना निसर्गानं दिलेली ही देणगी आहे, असं म्हणायला हवं.

छोटे साप, बेडूक, सरडा, पाल, जखमी झालेले पक्षी, उंदीर ते अगदी उडणारे किडे हे कापशीचं मुख्य खाद्य आहे. विणीच्या हंगामात कापशी नर खूप आवाज करुन पाठलाग करत, हवेतल्या हवेत कसरती करत मादीला आकृष्ट करतो. या काळात नर एकटाच काठ्या, काटक्या, हिरवी पानं आणि बारीक फांद्यांचा वापर करुन उंच झाडावर मोठ्या आकाराचं घरटं तयार करतो. दरवर्षी घरटे नवीन जरी बांधत असले तरी ते झाड किंवा जागा ही सहसा बदलली जात नाही. या घरट्यात मादी एकावेळी पांढऱ्या रंगाची तीन ते चार अंडी घालते. कापशी पक्ष्याचं पिल्लू करड्या रंगाचं असतं व त्याच्या अंगावर काळ्या रंगाचे ठिपके असतात. ही पिल्लं मोठी झाली तरी अन्नासाठी दोन ते अडीच महिने त्याच्या पालकांवरच विसंबून असतात.

❒ संग्राहक : अंकित जाधव






कथा

# स्वच्छता अभियान

शाम आणि सुंदर हे दोघे मित्र होते. ते दोघे नेहमीच बरोबरीने राहत असत. शाळेत जाताना, शाळेतून परत घरी येताना दोघेही सोबत येत-जात असत. शाळेचा अभ्यासही चांगल्याप्रकारे करत असत. त्यामुळे वर्गातही हुशार विद्यार्थी म्हणून त्यांची वाहवा होत असे. त्यांच्या घराजवळच एक टुमदार छानशी बाग होती. ते नेहमी त्या बागेत जात असत. त्या बागेत सर्वत्र कचराच कचरा पसरला होता. त्यामुळे त्या बागेची सुंदरताच नष्ट झाली होती. शामच्या हे लक्षात आले आणि त्याने सुंदरला सांगितले, की ही बाग आपण स्वच्छ करुया. फार घाण झाली आहे. इथे येऊन मन प्रसन्न होण्यापेक्षा मनात खिन्नता निर्माण होते. सुंदरला ही कल्पना आवडली.

दुसऱ्या दिवशी त्यांनी खराटा, टोपली घेऊन बाग स्वच्छ करण्यास सुरुवात केली. बागेतील सर्व

केर-कचरा गोळा करुन तो कचराकुंडीत जमा करु लागले. बागेत मनमोकळे करण्यासाठी येणारे वृध्द, तरुण मुलं हे पाहत असताना त्यांनासुध्दा वाटले, की आपणसुध्दा यांना मदत करावी. मग बागेत येणाऱ्या प्रत्येकाने या स्वच्छता अभियानामध्ये सहभाग घेतला. बघता-बघता सर्व बाग स्वच्छ झाली. बागेचा माळी हे पाहून खूश झाला. त्याला वाटले, की आपण या मुलांना फुलांचे गुच्छ देऊन खूश करावे. त्याने आपला मनोदय शामला सांगितला. शाम म्हणाला, "माळी काका, आपण ही फुलं तोडून आम्हाला गुच्छ देऊन सत्कार करु नका. ही फुलं म्हणजे बागेची शोभा आहे."

शामचे म्हणणे बागेत फिरायला आलेल्या सर्वांना पटले. शाम आणि सुंदरने बाग स्वच्छ केली हे गावातील सर्वांना कळले. सर्वजण ही बाग पाहायला आणि मुलांचे कौतुक करायला गोळा झाले; त्यात शाळेतील मुलेसुध्दा होती. सर्वांनी शाम आणि सुंदरचे अभिनंदन केले. हे पाहून शाम म्हणाला, "मी एकट्यानेच ही बाग स्वच्छ केली नाही तर या सर्वांनीच ही बाग स्वच्छ करण्यास सहकार्य केले आहे. पुढे शाम म्हणाला, की मला असं वाटतं, की आपण सर्व मिळून गावातील वस्त्यांमध्ये जाऊन हे स्वच्छता अभियान राबवू या. थोड्याच दिवसात आता दिवाळीचा सण येणार आहे. त्यावेळी आपण आपापली घरेच साफ करतो; आजूबाजूचा परिसर तसाच घाणेरडा राहून जातो." ही गोष्ट ऐकताच सर्वजण तयार झाले.

दुसऱ्या दिवशी सर्वजण मिळून गावातील एकेक वस्तीत जाऊन सर्व गाव, परिसर स्वच्छ केला. गावातील येण्याजाण्याच्या वाटा स्वच्छ केल्या. हे करत असताना गावातील सर्वच लोक या स्वच्छता अभियानामध्ये सामील झाले. बघता बघता संपूर्ण गाव, परिसर स्वच्छ झाला.

गावातील सरपंच, ग्रामसेवक, तलाठी यांनीसुध्दा या स्वच्छता अभियानाचे कौतुक करुन या स्वच्छता अभियानाची माहिती जिल्हाधिकाऱ्यांना कळविली. त्यानंतर जिल्हा अधिकारी येऊन त्याची पाहणी करुन गेले. शाम आणि सुंदर यांचा सत्कार करुन त्यांना बक्षिसही दिले. सर्व गावकऱ्यांनी दिवाळसण आनंदात साजरा केला.

❒❒❒

गुरु आणि निराकार प्रभु-परमात्मा दोन नसून एकच आहे. गुरुच्या देहाकडे पाहू नका. हा देह तुमचा गुरु नाहीये. देह तर नश्वर आहे; परंतु गुरु अविनाशी असतो. ज्ञान हाच आपला गुरु आहे. निराकार-प्रभुचं ज्ञान गुरुकडून प्राप्त होतं. गुरु जे इच्छितो तेच होत असतं आणि गुरु निराकार-प्रभुच्या आदेशाव्यतिरिक्त काहीच करत नाही. म्हणूनच मी तुम्हाला सांगतो, तुम्ही या निराकार ईश्वरावर प्रेम करा.

– युगपुरुष बाबा अवतारसिंहजी




# चित्र काढा आणि रंग भरा



## सामान्यज्ञान उत्तरे

१) क
२) अ
३) ब
४) क
५) ड
६) ब
७) ड
८) अ
९) ब
१०) अ

श
ब्द
को
डे

१
७
२

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ■ | ■ | १ ल | हा | २ न | ■ | ३ आ |
| ४ पां | ड | व | ■ | ५ व | डी | ल |
| ढ | ■ | ६ कु | बे | र | ■ | म |
| ७ रा | ८ जे | श | ■ | त्न | ■ | आ |
| ■ | रु | ■ | ९ ध्या | ■ | १० ते | रा |
| ■ | ११ स | ज्ज | न | सिं | ह | ■ |
| १२ फु | ले | ■ | चं | ■ | १३ रा | १४ जा |
| ■ | १५ म | शी | द | ■ | १६ न | ऊ |

॥ तू ही निरंकार ॥

वैर - द्वेषाच्या पाडून भिंती
प्रेमाचे पूल बांधत जाऊया



शंकरराव जाधव
मुखी, वाई तालुका

महालक्ष्मी

सर्वांसाठी... सर्वकाही...
एकाच ठिकाणी...

लग्न बस्त्याची
खास सोय !



अविनाश शंकरराव जाधव
प्रचारक, सातारा झोन

THE COMPLETE FAMILY SHOWROOM

मनमोहक साडया । ड्रेस मटेरिअल । मेन्स वेअर । चिल्ड्रन्स वेअर
। लेडीज वेअर । सुटींग शर्टींग । रेमण्ड सियारामचे विक्रेते

सद्गुरू की निगाहे करम एक अगर पड जाये,
मुक्कदर फिरसे लिखने को खुदा मजबूर हो जाये...

सद्गुरू होता जग का दाता जो चाहे कर सकता है
पत्थर दिल भी गर पैरों को छुले भवसागर तर सकता है

९९९, हरिहरेश्वर प्रतिक, आय.डी.बी.आय.बँक शेजारी, ब्राह्मणशाही, वाई (जि.सातारा)

फोन नं. : 9766727262 / 8999859073

RNI No. MAH/MAR/2004/15105
Postal Regd. No. MCE/78/2016-2018
WPP Licence No. MR/TECH/WPP-164/East/2018
Publishing date on 1st of every month
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office,
Mumbai-400001 on dated 1st of every month




।। तुही निरंकार ।।

ऑफिस : गाळा नं. १,४,६,८ महावीर इंडस्ट्रियल इस्टेट,
नारिंगी फाटा, विरार (पूर्व),
ता. पालघर, जि. ठाणे - ४०१३०५ (महाराष्ट्र)
कार्यालय : (०२५०) २५२७३२०/९८२२८८५५२६
ई-मेल : rajinustries2010@yahoo.in
janardanpatil6500@gmail.com
वेबसाईट : www.vijayaengineeringworks.com
www.rajindustries.net.in

जनार्दन एच्. पाटील
झोनल प्रमुख-नाशिक क्षेत्र

मे. विजया इंजिनिअरींग वर्क्स



मॅन्यु : स्पेशालिस्ट प्लास्टिक
इंजेक्शन मोल्ड आणि ब्लो मोल्ड
(घेर ओरम टाईप डाईज)

मे. राज इंडस्ट्रीज




मॅन्यु. फार्मास्यूटिकल्स कॅप्स (कोलॅप्सीबल आणि लॅमी ट्युब कॅप्स),
पेस्टीसाईड पॅकेजींग, एच.डी. आणि पी.पी. बॉटल



बाबाजी कंस्ट्रक्शन कं.

सिडको आणि सरकारमान्य प्राप्त १ रुम हॉल किचन, २ रुम हॉल किचन
दुकानाचे गाळे तसेच इन्डस्ट्रीअल गाळे कर्ज सुविधांसहित योग्य भावात मिळतील.

जनार्दन हा. पाटील
राकेश ज. पाटील
अंचित रा. पाटील
कुशल रा. पाटील